






# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा







रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, शुक्रवार दि. २७.०३.२०२६ | अंक नं. २९६ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020








# अहिल्यानगरमध्ये जमावाकडून पोलिसांना दगडफेक करत मारहाण

## अधिकाऱ्यासह ७ पोलिस जखमी, पोलिस व्हॅनचेही नुकसान; सुमारे १०० जणांवर गुन्हा दाखल, ६ आरोपींना अटक

नगर – शासकीय कर्तव्य बजावत असताना स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलीस पथकावर दगडफेक करून कामात अडथळा आणल्याची धक्कादायक घटना नगर–सोलापूर रोडवरील तुक्कड ओढा येथे २६ मार्च रोजी रात्री १० ते १०.३० वाजण्याच्या कालावधीत घडली. या प्रकरणी भिंगार कॅम्प पोलीस स्टेशन येथे नावे निष्पन्न झालेल्या ३१ जणांसह अन्य ७० जणांच्या जमावावर विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यातील ६ जणांना पोलिसांनी ताब्यात घेतले असून इतरांचा शोध सुरु आहे.

या घटनेबाबत पोलीस कॉन्स्टेबल सुनील रमेश मालणकर यांनी फिर्याद दिली आहे. २६ मार्च रोजी रात्री स्थानिक गुन्हे शाखेचे पथक परिसरात गस्त घालत असताना आरोपी योगेश पंडित बेरड (वय ३४, रा.वाकोडी, ता. नगर) याने आपली मोटारसायकल आडवी लावून पोलिसांचे वाहन अडवले. त्यानंतर दिपक कुंडलिक बेरड (वय ४५), देविदास शिवाजी बेरड (४४), राजु पंडित बेरड (वय ४३), मयुर अशोक पुंड (वय ३६), धर्मा दत्तात्रय बेरड (वय ३०) यांच्या सह जमावाला बोलावून घेतले. या जमावाने पोलिसांना घेराव घातला.

जमावाने पोलिसांना अश्लील शिवीगाळ करत धक्काबुक्की केली आणि दगडफेक सुरू केली. या हल्ल्यात फिर्यादी सुनील मालणकर यांच्यासह स.पो.नि. हरीश भोये, पोलिस अंमलदार अमोल कोतकर, भाऊसाहेब काळे, बाळासाहेब खेडकर, मनोज साखरे आणि भगवान धुळे हे जखमी झाले असून शासकीय वाहनाचेही नुकसान झाले आहे.

या प्रकरणी पोलिसांनी ताब्यात घेतलेल्या योगेश बेरड, दीपक बेरड, देविदास बेरड, राजू बेरड, मयूर पुंड आणि धर्मा बेरड यांच्या सह दरेवाडी येथील गणेश प्रकाश शिंदे, दिपक उर्फ खेकडा राजेंद्र बेरड, नेटके मेजर, राहुल राधाकिसन करांडे, मयुर भाऊसाहेब बेरड, भानुदास बेरड, विशाल अरुण करांडे, बाळासाहेब सुर्यभान करांडे, महादेव उर्फ महादु छबु करांडे, लहु मारुती करांडे, धनंजय अशोक करांडे, राजेंद्र बेरड, तुषार मोहन बेरड, सागर उर्फ मामु हरी बेरड, नितीन शिवाजी बेरड, भाऊसाहेब राजेंद्र बेरड, अनिल शंकर करांडे, संदीप शिवाजी करांडे, बापु करांडे, दिपक भाऊसाहेब करांडे, भाऊसाहेब करांडे, मोहन श्रीधर बेरड, सचिन अशोक बेरड, गणेश करांडे, कमलेश करांडे (सर्व रा. दरेवाडी, ता. नगर) व इतर ७० अनोळखी इसम यांच्या विरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम १३२, ३२४(४), १२१ (१), १२६ (२), १८९ (२), १८९ (६), १२५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास स.पो.नि. जगदीश मुलगीर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक योगेश पवार करत आहेत.

दरम्यान पोलिसांवर हल्ला करून त्यांना मारहाण करण्याची गेल्या १५ दिवसांतील ही दुसरी घटना आहे. यापूर्वी राहुरी येथे पोलिसाना बुरुडगाव येथील टोळक्याने कपडे फाडत मारहाण केली होती.






















जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक




नवा मराठा

फोन–२४१४१४१, २४१७७७७

भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. – कै.आचार्य गुंदेचा

email - navamaratha@gmail.com

# जमिनीच्या वादातून शेतकऱ्यावर जादूटोणा; एकावर गुन्हा दाखल

नगर – जमिनीच्या जुन्या वादातून एका ७५ वर्षीय वृद्धावर जादूटोणा करून त्यांना मानसिक त्रास देण्याचा धक्कादायक प्रकार नगर तालुक्यातील आव्हाडवाडी येथे उघडकीस आला आहे. या प्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात महाराष्ट्र नरबळी आणि इतर अमानुष अनिष्ट प्रथा व जादूटोणा प्रतिबंधक कायद्यानुसार गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, आव्हाडवाडी येथील रहिवासी आबासाहेब दगडू आंधळे यांचा आरोपी पोपट एकनाथ पालवे याच्यासोबत जमिनीचा वाद सुरू आहे. याच वादातून २६ मार्च रोजी सकाळी ६ वाजेच्या सुमारास आंधळे यांच्या घराच्या गेटसमोर जादूटोण्याचा प्रकार करण्यात आला. आरोपीने स्वतः किंवा इतर व्यक्तीमार्फत फिर्यादीवर जादूटोणा करून त्यांना इजा पोहचवण्याच्या उद्देशाने हा प्रकार केल्याचे तक्रारीत म्हटले आहे.

या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली असून, वृद्धाने तातडीने पोलिसांत धाव घेतली. सहाय्यक पोलीस निरीक्षक माणिक चौधरी आणि पोलीस हवालदार दिवटे यांनी घटनास्थळाची पाहणी केली आहे.

अंधश्रद्धेला खतपाणी घालणाऱ्या अशा प्रकारांविरुद्ध पोलिसांनी कडक पावले उचलली असून, आरोपीचा शोध घेतला जात आहे.

# राज्यात ३०-३१ मार्च दरम्यान मेघगर्जनेसह वादळी पावसाची शक्यता

**शेतकऱ्यांनी काढणी केलेल्या पिकांना वादळी पाऊस आणि वाऱ्यापासून सुरक्षित ठेवावे**

मुंबई – सध्या राज्यातील काही भागात अंशतः आभाळी हवामान असून ही स्थिती या आठवड्यात कायम राहण्याची शक्यता आहे. राज्याच्या दक्षिण भागांमध्ये दुपारनंतर स्थानिक स्वरूपाचा वादळी पाऊस पडू शकतो. हा पाऊस प्रामुख्याने कर्नाटक व तेलंगणा सीमेलगत असलेल्या मराठवाडा, मध्य महाराष्ट्र व विदर्भातील सीमावर्ती भागांमध्ये राहण्याची शक्यता आहे.

३० मार्च दरम्यान राज्यातील काही भागांमध्ये प्रामुख्याने दुपारनंतर आभाळी हवामान तयार होऊन मेघगर्जनेसह पाऊस आणि वादळी वाऱ्यांची स्थिती निर्माण होण्याचा प्राथमिक अंदाज आहे. सध्याच्या अंदाजानुसार ही स्थिती प्रामुख्याने खानदेश, मराठवाडा, पश्चिम विदर्भ तसेच मध्य महाराष्ट्रातील भागांमध्ये दिसून येऊ शकते. उर्वरित विदर्भात देखील हवामानात बदल दिसू शकतो. या दरम्यान विजांचा कडकडाट, वादळी वारे, पाऊस आणि काही ठिकाणी गारपिटीची शक्यता नाकारता येत नाही. ३१ मार्च रोजीदेखील राज्याच्या काही भागांमध्ये या हवामानाचा परिणाम दिसू शकतो. शेतकऱ्यांनी पुढील काही दिवस हवामानाच्या अद्ययावत अंदाजांकडे लक्ष ठेवावे व त्यानुसार शेतीची कामे नियोजित करावीत. सध्या रब्बी पिकांची काढणी सुरू असल्याने शेतकऱ्यांनी काढणी केलेली पिके सुरक्षित ठिकाणी साठवून ठेवावीत किंवा झाकून ठेवण्याची व्यवस्था करावी. तसेच वादळी वारे, पाऊस आणि संभाव्य गारपीटीपासून पिकांचे नुकसान टाळण्यासाठी आवश्यक ती खबरदारी घ्यावी, असे आवाहन कृषी विभागाकडून करण्यात येत आहे.

# मालमत्ता कराच्या वाढीव मूल्यांकनावरून असंतोष

**वाढीव कर स्थगित करण्याची नगरसेवक योगीराज गाडे यांची मागणी**

नगर – महानगरपालिकेकडून नागरिकांना पाठविण्यात आलेल्या मालमत्ता कराच्या नव्या मूल्यांकन नोटिसांमुळे शहरातील सर्वसामान्य नागरिकांमध्ये तीव्र चिंता आणि असंतोष निर्माण झाल्याची बाब समोर आली आहे. या पार्श्वभूमीवर नगरसेवक योगीराज शशिकांत गाडे यांनी अहिल्यानगर महानगरपालिका महापौर ज्योतीताई गाडे यांच्याकडे हस्तक्षेप करून वाढीव कर स्थगित करण्याची मागणी केली आहे.

नगरसेवक योगीराज गाडे यांनी महापौरांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, महानगरपालिकेकडून पाठविण्यात आलेल्या वाढीव मूल्यांकनाच्या नोटिसांमुळे अनेक नागरिकांना अपेक्षेपेक्षा खूप जास्त कर भरावा लागणार असल्याची भीती निर्माण झाली आहे. अनेक ठिकाणी प्रत्यक्ष पाहणी न करता किंवा योग्य निकष न लावता मूल्यांकन करण्यात आल्याच्या तक्रारी नागरिकांकडून मोठ्या प्रमाणावर येत आहेत. त्यामुळे या प्रक्रियेत पारदर्शकतेचा अभाव असल्याचेही नागरिकांचे म्हणणे आहे. याशिवाय शहरातील अनेक भागांमध्ये पाणीपुरवठा, रस्ते, स्वच्छता आणि गटार व्यवस्था यांसारख्या मूलभूत सुविधाही अद्याप अपुऱ्या असल्याची परिस्थिती आहे. अशा स्थितीत वाढीव मूल्यांकनाद्वारे करभार वाढविणे हे सर्वसामान्य नागरिकांवर अन्यायकारक आर्थिक ओझे टाकणारे असल्याचेही गाडे यांनी नमूद केले आहे.

या पार्श्वभूमीवर महापौरांनी तात्काळ हस्तक्षेप करून काही महत्त्वाचे निर्णय घ्यावेत, अशी मागणी करण्यात आली आहे. त्यामध्ये वाढीव मूल्यांकनाच्या नोटिसा तात्पुरत्या स्थगित करणे, पूर्वीचे दर कायम ठेवणे, संपूर्ण मूल्यांकन प्रक्रियेची पारदर्शक चौकशी करणे तसेच नागरिकांच्या हरकती नोंदविण्यासाठी विशेष शिबिरे आयोजित करावीत, अशा मागण्या गाडे यांनी केल्या आहेत.



मालमत्ता कराबाबत महापौरांनी हस्तक्षेप करुन नागरिकांना दिलासा द्यावा, या मागणीचे निवेदन महापौर ज्योतीताई गाडे यांना देताना नगरसेवक योगीराज गाडे. यावेळी उपमहापौर ॲड. धनंजय जाधव, महापौर यशवंत डांगे आदी उपस्थित होते.

# नगरसेवक श्रीपाद छिंदमवरून मनपाच्या महासभेत गदारोळ; छिंदमला काढले सभागृहाबाहेर, 'पद' रद्द करण्याचीही मागणी

नगर – अहिल्यानगर महापालिकेच्या अर्थसंकल्पीय (बजेट) महासभेत नगरसेवक श्रीपाद छिंदमच्या उपस्थितीवरुन जोरदार गोंधळ झाला. छिंदम हा शिवद्रोही आहे, त्याने छत्रपती शिवाजी महाराज यांचा अपमान केलेला आहे. त्यामुळे त्याला बोलण्याचा अधिकार नाही, या सभागृहात बसण्याचा अधिकार नाही. त्याला बाहेर काढा, अशी जोरदार मागणी सत्ताधारी व इतर नगरसेवकांनी करीत सभात्याग करण्याचा इशारा दिला. त्यानंतर छिंदम यांना इतर नगरसेवकांनी सभागृहातून बाहेर काढले.



महापालिकेच्या सभागृहातून नगरसेवक श्रीपाद छिंदम यांना बाहेर काढताना इतर नगरसेवक. (छाया – लहू दळवी)

महापालिकेच्या बजेटवर महापौर ज्योतीताई गाडे यांच्या अध्यक्षतेखाली व उपमहापौर ॲड. धनंजय जाधव यांच्या प्रमुख उपस्थितीत २७ मार्च रोजी महापालिकेच्या सभागृहात महासभा झाली. प्रारंभी आयुक्त यशवंत डांगे यांनी बजेटमधील महत्त्वाच्या तरतुदी सभागृहासमोर मांडल्या. महापालिकेला २४ कोटी ४० लाख रुपयांचा खर्च विविध विकासकामे, कर्मचाऱ्यांचे पगार व इतर कामांसाठी करावा लागतो. मात्र, यात दरवर्षी ४ कोटी रुपयांची तूट पडते. त्यामुळे महापालिकेला हा निधी उभा करताना मोठी कसरत करावी लागते, अशी भूमिका आयुक्त डांगे यांनी मांडली.

दरम्यान सभा सुरु असताना नगरसेवक श्रीपाद छिंदम यांनी बजेटवर प्रश्न उपस्थित केला असता सत्ताधाऱ्यांसह सर्व नगरसेवकांनी त्यावर आक्षेप घेतला. राष्ट्रवादी काँग्रेसचे नगरसेवक संपत बारस्कर, गणेश भोसले, मयूर बांगरे, प्रकाश भागानगरे, सुरेश बनसोडे, विकी जगताप यांनी छिंदमला सभागृहात बसण्यास परवानगी देऊ नये, अशी जोरदार मागणी केली. भाजपाचे नगरसेवक अमोल येवले यांनीही या मागणीला पाठिंबा दिला. त्यापाठोपाठ शिवसेना शिंदे व ठाकरे गटानेही छिंदमची सभागृहातून हाकालपट्टी करण्याची मागणी केली. संपत बारस्कर यांनी छिंदम याला सभागृहात न थांबता बाहेर जाण्याबाबत सांगितले. त्यानंतर काही नगरसेवकांनी आक्रमक होत छिंदमच्या दिशेने धाव घेतली. सर्वांनी मिळून त्याला सभागृहातून बाहेर काढले. ज्या व्यक्तीने छत्रपती शिवाजी महाराजांचा अपमान केला, त्याला सभागृहात प्रवेश देण्यात येणार नाही. याबाबत कायदेशीर मार्गाने अजेंड्यावर विषय घेऊन निर्णय घ्यावा. यापूर्वीही त्याचे पद रद्द करून त्याला सभागृहातून काढून टाकले होते. याबाबत आता पुन्हा ठराव करण्यात यावा. पुढच्या सभेत हा विषय अजेंड्यावर नसेल, तर आम्ही सभागृहात थांबणार नाही, असा इशारा संपत बारस्कर व इतर नगरसेवकांनी दिला.

दरम्यान नगरसेवक गणेश भोसले यांनी बहुतांश प्रकल्प शासनाच्या निधीतून होत असल्याची टीका करत महापालिकेच्या स्वतःच्या निधीतून काय कामे प्रस्तावित आहेत, तसेच ३०० कोटींच्या थकीत वसुलीबाबत प्रशासनाने काय केले, असा सवाल उपस्थित केला.

बाबासाहेब वाकळे यांनी सावेडीतील एनसीसी कार्यालयाच्या जागेवर व्यापारी संकुल उभारण्याची मागणी केली, तर संपत बारस्कर यांनी रासनेनगर येथील ५ एकर जागेत शाळा उभारण्याचा प्रस्ताव मांडला. सावेडी सिटी सर्वे तीन वर्षांपासून प्रलंबित असल्याचा मुद्दा कुमार वाकळे यांच्यासह इतर नगरसेवकांनी उपस्थित केला.

यावर उत्तर देताना यादव यांनी यापूर्वी भरलेले पैसे परत आले असून नव्याने सर्वेक्षणासाठी प्रस्ताव पाठवला असल्याचे सांगितले. आयुक्त डांगे यांनी महिनाभरात महासभा व स्थायी समितीचे ठराव घेऊन सिटी सर्व्हेसाठी निधी जमा केला जाईल, असे स्पष्ट केले. घरपट्टी सर्व्हेक्षणातील त्रुटींवरही तीव्र नाराजी व्यक्त करण्यात आली. कुमार वाकळे यांनी चुकीच्या पद्धतीने भाडेकरू म्हणून आकारणी झाल्याचा आरोप करत सर्वेक्षण रद्द करण्याची मागणी केली. महापालिकेच्या मालकीच्या जागांवरूनही चर्चा रंगली. निखिल वारे यांनी महापालिकेच्या मालकीच्या जमिनींची अचूक नोंद आहे का, असा प्रश्न उपस्थित केला. पिंपळगाव माळवी येथील सुमारे ७०० एकर क्षेत्राबाबत माहिती देताना स्नेहल यादव यांनी मोजणी पूर्ण झाल्याचे सांगितले, मात्र गाडळकर यांनी काही जागांवर अजूनही इतरांचा ताबा असल्याचे नमूद केले. या पार्श्वभूमीवर आयुक्त डांगे यांनी आठ दिवसांत समिती स्थापन करण्याचे आश्वासन दिले.

# महासभेच्या तोंडावर कर्मचाऱ्यांचा महापालिकेत ठिय्या

**पगार रखडले; कर्जाते हप्ते, मुलांच्या शाळेची फी भरायची कशी? तात्काळ तोडगा काढावा अन्यथा आंदोलन**

नगर – अहिल्यानगर महानगरपालिका कर्मचाऱ्यांचे फेब्रुवारी व मार्च महिन्यात होणारे पगार मार्च महिना संपत आला तरी पगार न झाल्यामुळे संतप्त कर्मचाऱ्यांनी २७ मार्च रोजी बजेट महासभेच्या तोंडावर थेट काम बंद आंदोलन सुरु करीत महापालिकेचे आयुक्त यशवंत डांगे यांच्या दालनासमोरच ठिय्या दिला. त्यामुळे बजेटची महासभेवर कर्मचारी आंदोलनाचे सावट दिसून आले.



पगार रखडल्यामुळे महापालिका कर्मचाऱ्यांनी महापालिकेतच ठिय्या आंदोलन केले. (छाया : लहू दळवी)

थकीत पगारासाठी महानगरपालिका कामगार युनियनच्या वतीने २७ मार्च रोजी कामबंद आंदोलन पुकारत प्रशासकीय इमारतीमध्ये कर्मचाऱ्यांनी ठिय्या देत प्रशासनाविरोधात तीव्र नाराजी व्यक्त केली. पगार रखडल्यामुळे कर्मचाऱ्यांवर मोठा आर्थिक ताण निर्माण झाला आहे. कर्जाचे हप्ते, मुलांच्या शाळेची फी, तसेच आजारपणाचे खर्च भागवणे कठीण झाले असून अनेक कर्मचारी आर्थिक संकटात सापडले आहेत. त्यामुळे कर्मचाऱ्यांमध्ये असंतोषाचे वातावरण निर्माण झाले आहे. या पार्श्वभूमीवर हे आंदोलन करण्यात आले. आंदोलनात कामगार युनियनचे अध्यक्ष बाबासाहेब मुदगल, जितेंद्र सारसर, सचिव आनंद वायकर यांच्यासह कर्मचाऱ्यांनी सहभाग घेतला.

दरम्यान, २७ मार्च रोजी महापौर ज्योतीताई गाडे यांच्या अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची बजेट महासभा दुपारी १ वाजता सुरु झाली. सभेत कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांवर दुपारी ३ वाजेपर्यंत चर्चा झालेली नव्हती.

कामगार युनियनचे अध्यक्ष बाबासाहेब मुदगल म्हणाले, फेब्रुवारी महिना संपून मार्चही संपत आला तरी कर्मचाऱ्यांना पगार मिळालेला नाही. त्यामुळे कर्मचारी अत्यंत कठीण परिस्थितीत आहेत. जोपर्यंत प्रशासनाकडून पगाराबाबत ठोस आश्वासन मिळत नाही, तोपर्यंत कर्मचारी कामकाज सुरू करणार नाहीत. प्रशासनाने तात्काळ यावर तोडगा काढावा, अन्यथा आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला.

## भरत कुंकूलोळ यांचे हृदयविकाराने निधन



श्रीरामपूर – मेनरोड येथील नक्षत्र कलेक्शनचे मालक शां.ज. पाटणी विद्यालयाचे चेअरमन, बुद्धिबळ असोसिएशनचे तालुका अध्यक्ष व माजी नगरसेवक भरत बुधमल कुंकूलोळ (वय ६०) यांचे हृदयविकाराने दुःखद निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन भाऊ, दोन मुले, पुतणे असा परिवार आहे. सतीश कुंकूलोळ व कल्याण कुंकूलोळ यांचे धाकटे बंधू, चि.विनीत व जिनेश कुंकूलोळ यांचे वडील, प्रितेश व हर्षल कुंकूलोळ यांचे चुलते होत.

## वसंतराव कोठुळे यांचे हृदयविकाराने निधन



नगर – खडकी येथील रहिवासी वसंतराव पिराजी कोठुळे (वय ६७) यांचे हृदविकाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर खडकी अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे पत्नी, २ मुले, १ मुलगी, ३ भाऊ, भावजय असा परिवार आहे. गणेश, महेंद्र यांचे ते वडील तर सरपंच प्रविण कोठुळे यांचे ते चुलते होत.

## ग्रामपंचायत वेळापूर, ता.कोपरगांव, जि.अहिल्यानगर बी–१ निविदा

ग्रामपंचायत वेळापूर,ता.कोपरगांव जि.अहिल्यानगर येथील खालील कामाचे नोंदणीकृत ठेकेदार,पुरवठादार यांचेकडून सीलबंद बी –१ निविदा दरपत्रके मागविणेत येत आहे .

| कामाचे नाव | योजनेचे नाव | ठेकेदार वर्ग | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|---|
| मौजे वेळापूर येथे भूमिगत पाईप गटार करणे | १५ वा वित्त आयोग २०२५-२०२६ | खुला | ३ लक्ष |

काम पूर्ण करण्याचा कालावधी : ६ महिने

अटी व शर्ती :

१)निविदा फॉर्म माहिती पत्रक दि.२७/०३/२०२६ ते ०४/०४/२०२६ या कालावधीत ग्रामपंचायत कार्यालयीन वेळेत मिळतील .

२) बी–१निविदा दि .०६/०४/२०२६रोजी सकाळी ११.०० वाजता उघडण्यात येतील .

३)निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार ग्रामपंचायतने राखून ठेवला आहे .

निविदेसोबत–१) जि. प.नोंदणी २) जी.एस.टी ३) पॅन कार्ड ४)अनुभवाचा दाखला

ग्रामसेवक/सरपंच

ग्रामपंचायत वेळापूर, ता. कोपरगाव,जि.अहिल्यानगर




हनुमान चालिसा पाठ

शनिवार दि. २८/३/२०२६

रात्री ८.३० ते १०.३०

**श्री दक्षिणमुखी हनुमान सत्संग मंडळ, सर्जेपुरा, अहिल्यानगर**

**प्रतापगड युवा प्रतिष्ठाण/वर्चस्व ग्रुप**, गोविंद गॅरेज जवळ, वंजारगल्ली, सागर मुर्तडकर ८०५५५४८५४७, सचिन दिवटे ९८९००६००२३

**मंगल भक्त सेवा मंडळ, मंगल दत्तक्षेत्र, एम.आय.डी.सी.**

**मोरया प्रतिष्ठाण**, चाणक्य चौक, बुरुडगाव रोड, अतुल कावळे ९१७५५२९१९१

**श्री लक्ष्मीनारायण सत्संग मंडळ, सारडा लेन, गंजबाजार**


**श्री. रोकडेश्वर हनुमान मंदिर**, भिंगार, मो.९४२२२२६६७८

**श्रीराम भक्त हनुमान सत्संग मंडळ (ट्रस्ट) नवीपेठ**

**अभिजित विजयकुमार बोरुडे**, अभिजित बोरुडे मित्र मंडळ, लक्ष्मी शंकर निवास, बालिकाश्रम रोड, बोरुडे मळा

**श्री संकट मोचन हनुमान मंडळ, श्री रामदेवरा दरबार, सारसनगर**

**श्री शिवतेज तरुण मंडळ**, श्री दक्षिणमुखी हनुमान मंदिर, जाधव मळा, बुरुडगाव, कायनेटीक कंपनीमागे ९८५०३९७३५३







टिप : मुव्ही-शो च्या वेळा बदलु शकतात

दिनांक : २७ मार्च ते ०२ एप्रिल २०२६




धुरंदर २

| | | | |
|---|---|---|---|
| 7.45 AM Dolby 7.1 | 8.30 AM Spectra X Scre | 9.00 AM Dolby 7.1 | 9.45 AM Recliner Seats |
| 12.00 PM Dolby 7.1 | 12.45 PM Spectra X Scre | 1.15 PM Dolby 7.1 | 2.00 PM Recliner Seats |
| 4.15 PM Dolby 7.1 | 5.00 PM Spectra X Scre | 5.30 PM Dolby 7.1 | 6.15 PM Recliner Seats |
| 8.30 PM Dolby 7.1 | 9.15 PM Spectra X Scre | 9.45 PM Dolby 7.1 | 10.30 PM Recliner Seats |

- For Screen No. 3 All Recliner Pay 50 Extra & Get 150 Food Voucher*
- Offer Valid On Window Booking & Phone Booking

Ahilyanagar First & Most Luxurious Cinematic Paradise !

AVAILABLE ON bookmyshow CONNPLEX SMART THEATRE AVAILABLE ON bookmyshow


3rd Floor, Kohinoor Mall, Premdan Chowk, Savedi, A.Nagar

Mo. 6353564618 / 7790094001

दैनंदिन मुव्ही-शो च्या वेळा खालील प्रमाणे

दिनांक : २७ मार्च ते ०२ एप्रिल २०२६

टिप : मुव्ही-शो च्या वेळा बदलु शकतात




धुरंदर २

| SCREEN - 1 | SCREEN - 2 |
|---|---|
| 9.00 am - Rs. 150/- | 8.00 am - Rs. 150/- |
| 1.30 pm - Rs. 250/- | 12.30 pm - Rs. 250/- |
| 6.00 pm - Rs. 300/- | 5.00 pm - Rs. 300/- |
| 10.15 pm - Rs. 300/- | 9.30 pm - Rs. 300/- |

आशा स्क्वेअर

कॅन्टीन सुविधा अत्यल्प दरात उपलब्ध

कोतवाली पोलीस स्टेशन जवळ, माणिक चौक, अ.नगर

लहानांपासुन मोठ्या मुला मुलींसाठी सेल महोत्सव आठवडा

सोमवार दि. २३/०३/२०२६ ते रविवार २९/०३/२०२६ पर्यंत

ब्रॅण्डेड व प्रिमियम क्वालीटीचे

- बाबासुट फक्त रु. ३५०/-
- कुर्ता पायजमा (लिनन मध्ये) फक्त रु. ३५०/-
- जिन्स पॅन्ट फक्त रु. २००/-
- भारी शर्ट फक्त रु. २००/-
- टि-शर्ट फक्त रु. १००/- पासुन पुढे
- फ्रॉक फक्त रु. २००/- पासुन पुढे
- मुलींचे पार्टी वेअर व वेस्टर्न ड्रेस फक्त रु. २००/- पासुन पुढे
- पॅन्ट अधिक टि-शर्ट फक्त रु. २००/- पासुन पुढे

फक्त महिलांसाठी ३ पिस सेट — रु. ५५० चा १, रु. ६५० चा १, रु. ७५० चा १ — तिनही एकत्र घेतल्यास फक्त रु. १५०० मध्ये

अहिल्यानगर शहरातील भव्य मॉल मयुरी लेडिज मॉल

मल्हार चौक, आयकॉन पब्लिक स्कुल जवळ, आगरकर मळा, अहिल्यानगर ९०२८२०११८८

# गृहिणी

## आरोग्य

### उन्हाळ्यात डिहायड्रेशन टाळण्यासाठी

उन्हाळ्यात उष्णतेमुळे शरीरातून जास्त घाम येतो, ज्यामुळे पाणी आणि इलेक्ट्रोलाइट्स (जसे सोडियम, पोटॅशियम) कमी होतात. यामुळे थकवा, चक्कर, डोकेदुखी किंवा उष्माघाताचा धोका वाढतो. घरगुती पेये नैसर्गिकरित्या हायड्रेटिंग असतात, इलेक्ट्रोलाइट्स पुरवतात आणि बाजारातील साखरयुक्त शीतपेयांपेक्षा आरोग्यदायी असतात. लिंबूचा रस, पाणी, थोडी साखर किंवा मध, मीठ आणि जिरे पूड घालून बनवा. व्हिटॅमिन C ने भरपूर, इलेक्ट्रोलाइट्स रिचार्ज करते, त्वरित हायड्रेशन देते. दही पाण्यात मिसळून, मीठ, जिरे पूड, पुदीना आणि हिरवी मिरची घाला. नैसर्गिक प्रोबायोटिक्स, थंडावा आणते, पचन सुधारते आणि डिहायड्रेशन टाळते. थेट ताज्या नारळातून प्या किंवा त्यात थोडा लिंबू मिसळा. नैसर्गिक इलेक्ट्रोलाइट्सचा उत्तम स्रोत (पोटॅशियम भरपूर), शरीर त्वरित हायड्रेट होते. कोकम भिजवून, साखर, मीठ आणि जिरे पूड घालून बनवा. शरीरातील उष्णता कमी करते, एसिडिटी दूर करते आणि डिहायड्रेशन रोखते.

## पाककला

### केशरयुक्त रबडी

**साहित्य** : फुल क्रीम दूध: १ लिटर, साखर: ४-५ मोठे चमचे, केशर: १५-२० काड्या, वेलची पूड: अर्धा छोटा चमचा, सुकामेवा: बदाम, पिस्त्याचे काप

**कृती** : सर्वात आधी एका जाड बुडाच्या कढईत दूध गरम करायला ठेवा. दूध उकळू लागल्यावर गॅसची फ्लेम मध्यम करा. जेव्हा दुधावर साय येईल, तेव्हा ती चमच्याने कढईच्या कडेला चिटकवून ठेवा. हीच साय रबडीला 'लच्छेदार' (दाणेदार) बनवते. दूध कढईच्या तळाला लागू नये म्हणून मधून मधून ढवळत राहा, पण कडेला जमा केलेली साय काढू नका. जेव्हा दूध आटून मूळ प्रमाणापेक्षा १/३ (एक तृतीयांश) उरेल, तेव्हा त्यात भिजवलेले केशर आणि साखर टाका. साखर विरघळेपर्यंत ५-७ मिनिटे आणखी शिजवा. आता गॅस बंद करा. कढईच्या कडेला जमा केलेली सर्व साय खरवडून दुधात एकत्र करा. यामुळे रबडीत छान जाड थर तयार होतील. शेवटी त्यात वेलची पूड आणि थोडे कापलेले बदाम-पिस्ते टाका.

## वास्तू

### हिंगाने नजर उतरवा

✻ जर कुटुंबातील एखादा सदस्य बराच काळ आजारी असेल किंवा वाईट नजरेच्या प्रभावाखाली असेल, तर डोक्यापासून पायापर्यंत सात वेळा हिंगाचा तुकडा हलवा. यामुळे वाईट नजर दूर होईल.

✻ हिंग आगीत जळत असल्याने, त्याचा वास आणि धूर घरातील नकारात्मक ऊर्जा नष्ट करतो. जर तुमचे काम बिघडणार असेल, तर हा उपाय तुमच्या नशिबातील अडथळे दूर करतो.

## सौंदर्य

काळी वर्तुळे दूर करण्यासाठी मध आणि लिंबाचा रस मिसळून लावता येते. लिंबाच्या रसात सायट्रिक ॲसिड आढळते, जे त्वचेवरील डाग साफ करण्यास मदत करते.

## सल्ला

केशर नसेल तर चिमूटभर हळद किंवा खाण्याचा पिवळा रंग वापरू शकता, पण केशराचा स्वाद नैसर्गिक आणि उत्कृष्ट असतो. रबडी तुम्ही गरम खाऊ शकता किंवा फ्रिजमध्ये थंड करून सर्व्ह करू शकता.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

शनिवार, दि. २८ मार्च २०२६

**---, शके १९४८ पराभवनामसंवत्सर, चैत्र शुक्लपक्ष, पुष्य १४|५०, सूर्योदय ०६ वा. २७ मि. सूर्यास्त ०५ वा. ३० मि.**

## राशिभविष्य

**मेष** : जर आपणास एका कार्यात वाढ मिळाली तर इतर कार्यात अवनती होणे शक्य आहे.

**वृषभ** : सामुदायिक कार्यांमध्ये अनुकूल. सहकार्यांकबरोबर प्रतिष्ठा वाढेल. आरोग्य उत्तम राहील.

**मिथुन** : मनोरंजनाच्या विषयांमध्ये वेळ खर्च होईल. वैवाहिक जीवनात वातावरण मधुर राहील. पत्नीपासून सुख मिळेल.

**कर्क** : गृह भूमीसंबंधी विषयांमध्ये लाभ मिळेल. खरेदी-विक्रीत लाभ मिळण्याची स्थिती बनेल. वैवाहिक सुख वाढेल.

**सिंह** : आजचा दिवस आपणास पैसे मिळवण्याच्या नव्या संधी देईल परंतु घाई करणे वादाला कारण ठरू शकते.

**कन्या** : कौटुंबिक वातावरण सुखद राहील. आर्थिक प्रयत्नांमध्ये स्थिती अनुकूल राहील. सौंदर्याकडे आकर्षण वाढेल.

**तूळ** : आरोग्य उत्तम राहील. सामुदायिक उपक्रमांमध्ये समक्षता आपणास सुविख्यात बनवेल.

**वृश्चिक** : आपल्या जीवनातील इच्छित वस्तूवर लक्ष द्या. कौटुंबिक प्रकरणांमध्ये कोणत्याही प्रकारचे विवाद टाळा.


**धनु** : व्यापार-व्यवसायात स्थितीत सुधार होईल. अनुकूल स्थिती मिळेल. वरिष्ठांशी वितुष्ट येण्याची शक्यता आहे.

**मकर** : नेहमीपेक्षा अधिक चांगले काही घडण्यासाठी आपणास आपल्या कामात एकाग्रता वाढवण्याची आवश्यकता आहे.

**कुंभ** : एखाद्या जुन्या मित्राशी भेट होण्याची शक्यता आहे. व्यापार-व्यवसायात आशानुरूप परिणाम मिळतील.

**मीन** : वेळेचे सदुपयोग केल्याने यश मिळेल. आरोग्य उत्तम राहील. आपल्या हातात आलेल्या संधी निसटू देऊ नका.

## शब्दगंध क्र. ७३९६ सौ.शैलजा कुलकर्णी




**आडवे शब्द** : १) मोघम ठेवलेले; डिपॉझिट ४) एक फळ ६) एका हाताची ओंजळ ७) पाप; अधर्म ९) बैलाला नियंत्रणात ठेवण्यासाठी त्याच्या शिंगाला बांधतात ती दोरी १०) जल; नीर; जीवन ११) आकाश; अंबर; गगन १३) गळा निळा असतो म्हणून महादेवाला असेही नाव पडले १५) वर्ष (ग्रामीण) १७) एक प्राणी; अज १९) एक मराठी आडनाव २०) आशीर्वाद; नवरामुलगा २१) क्रोध २२) उजळ रंगाचा; गौरवर्णीय २३) नामाभिधान; होडी; जहाज २४) अगदी जख्खड म्हातारा २५) नीच मनोवृत्तीचा

**उभे शब्द** : १) अवमान; मानखंडना; पाणउतारा २) अमेरिकेची अंतराळ संशोधन संस्था (संक्षिप्त नाव ३) तपास करणारा ४) आकडा; मांडी ५) स्त्री; सुंदरी ८) ओझे वाहणारा पूर्वीचा गावकामगार १०) अध्यापक; पुराणिक १२) प्रपंचरूपी समुद्र १४) कटी; कमर १६) दोरा गुंडाळण्याचे चक्र (इंग्रजी) १८) कारकीर्द १९) एक लढाऊ विमान २०) विष्णूचा तिसरा अवतार २३) श्वासोच्छ्वास करण्याचे इंद्रिय

**शब्दगंध क्र. ७३९५ चे उत्तर**



**फिल्मीचक्कर क्र. १२२९ चे उत्तर**



# ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ मुलांचे विश्व ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻

**सुविचार** : पैसा कितीही असु द्या, तो शेवटपर्यंत जिवंत नाही ठेवू शकत, लक्षात ठेवा पैसा श्रीमंत्र बनवतो अमर नाही.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### जेनेरिक आणि ब्रँडेड औषधांमध्ये काय फरक आहे?

औषधे आता जवळजवळ प्रत्येक कुटुंबाचा भाग बनली आहे. बहुतेक कुटुंबांमध्ये, दररोज औषध घेणारा कोणीतरी असतो. औषधांच्या बाजारात, जेनेरिक औषधांबद्दल अधिक चर्चा होते. आम्ही तुम्हाला माहित आहे का?, ब्रँडेड औषधे आणि जेनेरिक औषधां मध्ये फरक काय आहे. व जेनेरिक औषधे इतकी स्वस्त असण्याचे कारण काय आहे. चला तर जाणून घेऊ या....

ब्रँडेड आणि जेनेरिक औषध म्हणजे काय?

बाजारात दोन वेगवेगळ्या प्रकारची औषधे उपलब्ध आहे. या दोघांमधील फरक जाणून घेण्यापूर्वी, औषधे कशी बनवली जातात हे जाणून घ्या. खरं तर, त्यात एक सूत्र आहे, ज्यामध्ये औषधे वेगवेगळी रसायने मिसळून बनवली जातात. जसे की जर कोणी वेदनाशामक औषध बनवत असेल तर ते औषध वापरलेल्या साहित्यापासून बनवले जाते. जर ते औषध एखाद्या मोठ्या कंपनीने बनवले असेल तर ते ब्रँडेड औषध बनते. यामध्ये, कंपनीचे नाव एकच असते, तर ते वेगवेगळ्या साहित्यापासून बनवले जाते, परंतु तुम्ही हे लक्षात घेतले असेल की औषधाच्या आवरणावर कंपनीचे नाव वरच्या बाजूला असते.

तसेच जेव्हा एखादी छोटी कंपनी समान साहित्य मिसळून औषध बनवते, तेव्हा बाजारात ते जेनेरिक औषधे म्हणून ओळखले जाते. या दोन्ही औषधांमध्ये कोणताही फरक नाही, फक्त नाव आणि ब्रँडचा फरक आहे. औषधे सॉल्ट आणि मोलिक्यूल्स पासून बनवली जातात. म्हणून लक्षात ठेवा की औषधे खरेदी करताना, त्याच्या सॉल्टकडे नक्कीच लक्ष द्या. कोणत्याही कंपनीवर नाही, ज्याच्या नावाने औषधे विकली जातात. जेनेरिक औषधे फक्त जेनेरिक नावाने विकली जातात. ब्रँडेड आणि जेनेरिक औषधांमधील मोठा फरक म्हणजे प्रतिमा तयार करणे आणि विक्री वाढविण्यासाठी मार्केटिंग नियोजनाचा एक भाग आहे.

जेनेरिक औषधे स्वस्त का असतात याचे कारण म्हणजे ती कोणत्याही मोठ्या ब्रँडशी संबंधित नसतात. म्हणूनच या औषधांच्या मार्केटिंगवर जास्त पैसे खर्च केले जात नाहीत. यासोबतच, संशोधन, विकास, विपणन, प्रमोशन यावर मोठा खर्च येतो. परंतु, जेनेरिक औषधे पहिल्या डेव्हलपर्सच्या फॉर्म्युला आणि सॉल्ट वापरून त्यांचा पेटंट कालावधी संपल्यानंतर बनवली जातात. हे थेट उत्पादन आहे, कारण त्यांची चाचणी आधीच झाली आहे.

### कोल्ह्याची रणनिती

एका जंगलामध्ये महाचतुरक नावाचा कोल्हा राहायचा. एक दिवस जंगलात त्याला मेलेला हत्ती दिसला. त्याला खूप आनंद झाला. त्याने हत्तीचा मृतदेह मध्ये आपले दात फसविले. पण हत्तीच्या जाड कातडीमुळे त्याचे दात फासले नाही.

तो विचार करू लागला. त्याला दुरून एक सिंह येतांना दिसला. कोल्ह्याने सिंहाचे स्वागत केले व त्याला नमस्कार केला.व म्हणाला की, महाराज मी तुमच्यासाठी हत्तीची शिकार केली आहे. तुम्ही या हत्तीचे मांस खाऊन माझ्यावर उपकार करा. पण यावर सिंह म्हणाला की, मी आयती शिकार खात नाही त्यामुळे तूच ही शिकार खा.

कोल्ह्याला आनंद झाला होता. पण तेवढ्यात दुरून एक वाघ येतांना त्याला दिसला. कोल्हा त्या वाघाला म्हणाला की, वाघ दादा तुम्ही इथे कशाला आलेत? मला सिंहाने या हत्तीचे रक्षण करण्यास सांगितलं आहे. सिंहाने हा हत्ती मारून ठेवला आहे. जर तुम्ही ही शिकार खाल्ली तर सिंह तुम्हाला ठार कारेल. हे ऐकून वाघ तिथून पळून जातो. तेवढ्यात कोल्ह्याला समोरून बिबट्या येतांना दिसतो. बिबट्याचे दात तीक्ष्ण आहे असे कोल्ह्याला वाटते. तसेच तो विचार करू लागतो की, असे काहीतरी केले पाहिजे जेणेकरून ते हत्तीची कातडी फाटेल आणि बिबट्या मांसही खाणार नाही. कोल्हा बिबट्याला म्हणाला की,

प्रिय बिबट्या,

तू इथे कसा आलास? तुलाही थोडी भूक लागली आहे का? पण सिंहाने या हत्तीचे रक्षण करण्याची जवाबदारी माझ्यावर सोपवली आहे. परंतु तुम्ही त्यातील काही मांस खाऊ शकता. सिंह येताना दिसताच मी तुम्हाला सांगेल, मग तुम्ही निघून जा. सुरुवातीला बिबट्याने घाबरून मांस खाण्यास नकार दिला, पण कोल्ह्याने समजूत काढल्यानंतर बिबट्याने काही क्षणातच हत्तीची कातडी फाडली. तसेच बिबट्या मांस खाण्यास सुरुवात करताच कोल्हा बिबट्याला म्हणाला की, पळ सिंह येत आहे.

हे ऐकून बिबट्या पळून गेला. कोल्ह्याला खूप आनंद झाला. त्याने अनेक दिवस त्या हत्तीचे मांस खाल्ले. त्याने त्याच्या बुद्धीने त्याच्या समस्येवर उपाय शोधला.

तात्पर्य : बुद्धिमत्तेचा योग्य उपयोग केल्यास सर्वात कठीण काम देखील शक्य होते.

## जीवन का अमृत (भाग १)



### सद्गुरू

उन्होंने अपने भौतिक शरीर पर ले लिया, हमदर्दी के नियम के अनुसार। वे जिस्म-जिस्मानियत से ऊपर थे और उन्होंने अपने भौतिक शरीर को, जो कि सदा नाशवान् होता है, सूली पर चढ़ाने दिया और खुद आध्यात्मिक तौर से उच्चतर मंडलों में पहुँच गए। सांसारिक लोगों ने, जिनकी आंतरिक आँखें बंद थी, समझा कि ईसामसीह सिर्फ एक शरीर थे, जबकि वास्तव में वे शरीर, मन और महान आत्मा (क्राईस्ट-शक्ति ), इन तीनों से बने थे । वे क्राईस्ट-शक्ति या गुरु-शक्ति थे, जो उस चुने हुए भौतिक शरीर में काम कर रही थी । गुरु-शक्ति कभी नहीं मरती और सदा प्रभु के साथ रहती है। जीसस अपने समय के मुक्तिदाता थे। जिन्होंने उनके द्वारा बताए गए विज्ञान का पालन किया, वे मुक्ति पा गए और आज भी वही नियम लागू है- -एक जिंदा सतुगुरु की जरूरत होती है। मुझे विश्वास है कि अब आपको हर चीज साफ हो गई होगी। जो कोई भी सतुगुरु से अंतर में बात करता है, वह सतुगुरु के द्वारा ईसा मसीह को देख सकता हैं

१५. यह पुराने कर्मों का फल है कि दो अलग-अलग स्वभाव के इंसान पवित्र बंधन में बँध जाते हैं, ताकि उनका आपस का लेना-देना समाप्त हो सके।

यह सोचना सही नहीं हैं कि आपकी गलत व्यक्ति से शादी हुई है, क्योंकि यह पूरी तरह दिव्य योजना के अनुसार है कि कर्मों की वजह से, केवल पूर्वनिश्चित लोगों की आपस में शादी होती है ।

१६. यह मौजूदा जिंदगी मुख्यतः पुराने कर्मों पर आधारित है । जो भी भाग्य के हेर-फेर होते हैं, वे क्षण भंगुर होते हैं, ताकि सतुगुरु की दया-मेहर से भविष्य बेहतर और खुशहाल हो सके।

जो आध्यात्मिक जिज्ञासु, जिंदा सतुगुरु के साये में, विनम्र होकर अपनी आध्यात्मिक निपुणता के प्रति समर्पित हैं, वे अपने पुराने कर्मों के प्रति आम माफी का दुर्लभ उपहार पाते हैं, नहीं तो ये उनके लिए सहन करने बहुत मुश्किल होते ।

अनुशासित शिष्यों को सिर्फ बहुत थोड़ा सा कर्म भुगतना पड़ता है, जो कि हमेशा दिव्य दया से ओतप्रोत होता है।

१७. एक समर्थ सतुगुरु से नामदान के बाद, शिष्य का अपने सच्चे घर लौटना पक्का हो जाता है। जो नामदान के बाद, पापों और बुराईयों से भरी जिंदगी जीते रहते हैं और सांसारिक प्रलोभनों

(क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## चिरंतन प्रेमाकडे वाटचाल (नाती घट्ट विणू या)

### स्वत: बरोबर नाते निर्माण करा

सुरेश ओबेरॉय : जर मी मनाने कमकुवत असेन आणि त्यामुळे जर मी नेहमीच चिडचिड करत असेन किंवा अस्वस्थ राहत असेन तर यामुळे माझी इतरांबरोबर असलेली नाती ही कमकुवत होतील का ?

शिवानीदीदी : हे आपोआपच घडणार नाही का? मी, स्वतःच ते बीज आहे जे प्रत्येक विचाराची आणि कर्माची निर्मिती करतं, जो तरंग आहे. ह्या बीजाचा पहिला परिणाम आपल्या भावनिक आरोग्यावर होतो. दुसरा परिणाम आपल्या शरीरावर होतो. आपण निर्माण करत असलेल्या प्रत्येक विचाराचा परिणाम आपल्या शरीरातील प्रत्येक पेशीवर होतो. जसं बीज असतं, तसंच आपलं शरीर असतं. जेव्हा आपण लोकांना भेटतो, तेव्हा आपली जशी मानसिक अवस्था असेल तसाच विचार आणि कृती आपण त्यांच्या बाबतीत करू. तुमच्याशी संवाद साधताना जर मी कमकुवत असेन आणि तुमचा एखादा मुद्दा जरी मला पटला नाही तर लगेच माझी चिडचिड होईल आणि मी त्याकडे दुर्लक्ष करू शकणार नाही. आपल्याला वाटतं की समोरच्याने आपल्या इच्छेप्रमाणेच वागावं. समजा ते तसं वागले नाहीत तर तुम्ही पटकन चिडून तुमची प्रतिक्रिया द्याल. या सगळ्याचा माझ्या नात्यांवर परिणाम होणार नाही का ?

काही वर्षांपूर्वीपर्यंत, संपूर्ण गावातील लोक किंवा शेजारीपाजारी एखाद्या कुटुंबासारखे एकोप्याने, गुण्यागोविंदाने नांदत होते. तेव्हाही त्यांच्या विचारांत आणि वागण्यात फरक होताच पण त्यांच्याकडे तडजोड करायची, सहन करायची आणि तरीही एकमेकांना सहकार्य करायची अद्भुत शक्ती होती. त्यामुळे, शंभरपेक्षाही जास्त माणसं एक कुटुंब म्हणून एकत्र राहू शकत होती.

सुरेश ओबेरॉय : मला हे जाणून घ्यायचंय की, एकत्र राहण्याशिवाय इतर कोणताच पर्याय त्यांच्याकडे नव्हता की खरोखरंच ती एकमेकांविषयीच्या प्रेमाची ताकद होती ?

शिवानीदीदी : ती आत्म्याची शक्ती होती. तेव्हा लोक 'सोल कॉन्शन' म्हणजेच आत्म्याची जाणीव ठेवून असायचे, त्यासंबंधी सजग असायचे. म्हणजेच, त्यांच्या मूळ स्वभावामुळे किंवा निसर्गाच्या सान्निध्यात राहत असल्यामुळे परिस्थिती किंवा माणसं या कशाचाही त्यांच्यावर फार काही परिणाम झाला नाही. सुरेश ओबेरॉय : पूर्वीच्या काळी लोक कमकुवत नव्हते ?

(क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

एक मुलगा पाणी पुरीवाल्याला म्हणतो : भावा हे इंजिनिअरिंग कॉलेज कसे आहे ?
पाणी पुरीवाला : एकदम जबरदस्त आहे मी पण इंजिनिअरिंग इथेच केलेली आहे !

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

✻ जगात पहिली रेल्वे सेवा कोठे व कधी सुरू झाली?

– इंग्लंड १८२५

**– अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

## आहारवेद – आरोग्य संवर्धन

### द्राक्षे

त्यामुळे मूतखडा, लघवीच्या वेळी होणाऱ्या वेदना व जळजळ यावर द्राक्षे मूत्रल गुणाचे असल्या मुळे उपकारक ठरतात.

११) दारूचे व्यसन सोडण्यासाठीही द्राक्षांचा उपयोग होतो. द्राक्षे हे अल्कोहोलचे शुद्ध रूप असल्याकारणाने दारूच्या आठवणीने व्याकूळ होणाऱ्या रुग्णाला द्राक्षरस द्यावा. काही दिवस सतत द्राक्षरस दिल्याने दारूचे व्यसन सोडता येऊ शकते.

१२) वर्षभर द्राक्षे उपयोगात यावीत म्हणून द्राक्षरस, द्राक्षावलेह, द्राक्षारिष्ट, द्राक्षासव या स्वरूपात त्यांचा उपयोग करावा.

एक चमचा पपईचा रस, एक चमचा मध, चार चमचे गरम पाणी मिसळून हे मिश्रण प्यावे. त्यानंतर थोड्या वेळाने दोन चमचे एरंडेल तेल प्यावे. असे सलग दोन ते तीन दिवस घेतल्यास आतड्यांमधील कृमी व जंत नष्ट होतात.

पपईचे बी व पान यामध्ये कॅरिसिन हे द्रव्य असते व तेदेखील कृमी व जंतावर उकृष्ट औषध आहे. यासाठी पानांचा व बियांचा रस मधात मिसळून प्यावा.

चेहऱ्याच्या सुंदरतेसाठी सुद्धा कच्च्या पपईचा रस तोंडावर चोळावा. यामुळे चेहऱ्यावर चकाकी येऊन पुटकुळ्या, मुरुमे, सुरकुत्या नाहीशा होतात.)

पपईमध्ये अनेक प्रकारचे औषधी गुणधर्म आहेत. त्यामध्ये असणाऱ्या एन्झाईममुळे कॅन्सरसारख्या आजारांचा प्रभाव कमी होतो. पिकलेल्या पपईचा गर हा श्रमहारक व तृप्तीदायक असतो. पपई मूत्रल असल्याने मूत्रपिंडाचे विकार दूर करण्यासाठी पपई उपयुक्त ठरते.

अपचन, आम्लपित्त, बद्धकोष्ठता हे पोटाचे विकार पपईतील पेपेनमुळे दूर होतात. पपईच्या सेवनाने स्त्रियांमधील मासिक स्रावामध्ये नियमितपणा येतो. चिरतारुण्य टिकविण्यासाठी, वार्धक्य टाळून शरीरावरील सुरकुत्या नष्ट करण्यासाठी, शक्ती व उत्साह प्राप्त होण्यासाठी रोज दोन फोडी पपईच्या खाव्यात.

**(क्रमशः)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००

# राष्ट्रसंत कैकाडी महाराज यांनी संपूर्ण जगाला मानवतेची शिकवण दिली

**धनंजय जाधव यांचे प्रतिपादन**

नगर – राष्ट्रसंत कैकाडी महाराज यांनी किर्तन व प्रवचनाच्या माध्यमातून समाजाचे प्रबोधन केले आहे. मानवांनो माणुसकीला जागा, जरा माणसात मिसळूनी वागा. असा दिव्य संदेश महान तपस्वी राष्ट्रसंत कैकाडी महाराज यांनी दिला आहे. राष्ट्रसंत कैकाडी महाराज यांनी प्रत्येकाने माणुसकीचा धर्म पाळावा. असे सांगितले आहे. राष्ट्रसंत कैकाडी महाराज यांचे विचारांचे अनुकरण केल्यास जीवन सफल होईल. राष्ट्रसंत कैकाडी महाराज यांनी संपूर्ण जगाला मानवतेची शिकवण दिली, असे प्रतिपादन उपमहापौर धनंजय जाधव यांनी केले आहे.



टिळक रोड येथील पटेल मंगल कार्यालय येथे अहिल्यानगर कैकाडी समाज संघटनेच्या वतीने राष्ट्रसंत कैकाडी महाराज यांची जयंती व रामनवमी साजरी करण्यात आली. याप्रसंगी उपस्थित असलेले उपमहापौर ॲड. धनंजय जाधव आदी.

टिळक रोड येथील पटेल मंगल कार्यालय येथे अहिल्यानगर कैकाडी समाज संघटनेच्या वतीने राष्ट्रसंत कैकाडी महाराज यांची जयंती व रामनवमी उत्साहाने साजरी करण्यात आली. यावेळी भजन व प्रवचनाचा कार्यक्रम झाला. अहिल्यानगर येथील कैकाडी समाज संघटनेने महात्मा फुले दाम्पत्य स्मारक समितीला जाहीर पाठिंबाचे पत्र दिले आहे. राष्ट्रसंत कैकाडी महाराज यांची महाआरती उपमहापौर धनंजय जाधव, माजी उपमहापौर गणेश भोसले, नगरसेवक प्रकाश भागानगरे, पै.महेश लोंढे यांच्या हस्ते करण्यात आली. यावेळी भारतीय जनता पार्टीचे उपाध्यक्ष बाळासाहेब भुजबळ, उद्योजक विनोद पुंड, अहिल्यानगर कैकाडी समाज संघटनेचे जिल्हाध्यक्ष ॲड.विनोद गायकवाड, डि.आर. गायकवाड, शहराध्यक्ष विशाल माने, शहर उपाध्यक्ष किशोर जाधव, सचिव राजेंद्र गायकवाड, बाबासाहेब जाधव, संतोष गायकवाड, के एस माने, फुलचंद जाधव, बी.के.माने, शिवनाथ गायकवाड, भिमराज गायकवाड, हौशीराम गायकवाड, मुलुखुराज गायकवाड, कुंडलिक जाधव, आसाराम जाधव, निनाद गायकवाड, संदीप माने, पार्थ गायकवाड आदींसह समाज बांधव भगिनी उपस्थित होते.

ॲड. विनोद गायकवाड म्हणाले, अहिल्यानगर येथील कैकाडी समाज संघटनेच्या वतीने दरवर्षी सामाजिक आणि धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. राष्ट्रसंत कैकाडी महाराज यांच्या शिकवणीप्रमाणे कैकाडी समाजाची वाटचाल सुरू आहे. प्रत्येकाने एकमेकांशी वागताना प्रेमाने वागावे. तसेच माणुसकीचा धर्म पाळून माणसाला माणसाप्रमाणे वागणूक द्यावी. राष्ट्रसंत कैकाडी महाराज यांचे विचार सर्वांसाठी प्रेरणादायी आहेत.

विशाल माने म्हणाले, राष्ट्रसंत कैकाडी महाराज यांची जयंती दरवर्षी मोठ्या भक्ती भावाने साजरी केली जाते. महात्मा फुले व सावित्रीबाई फुले या थोर महापुरुषांनी सर्व समाजाला शिक्षण दिले आहे. महात्मा फुले यांचे भव्यदिव्य स्मारक अहिल्यानगर शहरात होत आहे. याचा सर्व समाजाला अभिमान आहे. महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांचे स्मारक लवकर पूर्ण व्हावे. यासाठी अहिल्यानगर येथील कैकाडी समाजाने महात्मा फुले दांपत्य स्मारक समितीला जाहीर पाठिंबाचे पत्र दिले आहे.

महाप्रसादाचे आयोजन भीमराज जाधव परिवाराच्या वतीने करण्यात आले होते. राष्ट्रसंत कैकाडी महाराज यांच्या जयंतीनिमित्त अहिल्यानगर, बीड, जालना, नाशिक, जळगाव, अमरावती येथील समाज बांधव व भगीनी उपस्थित होते.

यावेळी सूत्रसंचालन ॲड.किरण जाधव यांनी केले. फुलचंद जाधव यांनी आभार मानले.

# प्रेरणादायी अक्षरधन

## ज्ञानदेवांचा चिद्‌विलासवाद

"मुसाफिर" वाचनीय मननीय प्रेरणादायी अक्षरधन संकलन: दिशान फिचर्स

समाज मनाला सुखावणारी चैतन्य पालवी डॉ. रामचंद्र देखणे 'चपराक' प्रकाशित ललित चिंतन

संपूर्ण विश्व हे वासुदेव तत्त्वाने भरले आहे, हे ज्याला समजले तोच खरा ज्ञानी आणि तोच खरा भक्त होय. ज्ञानदेव हेच सूत्र सांगतात...

हे समस्तही श्री वासुदेवो ।
ऐसा प्रतितीरसाचा ओतला भावो ।
म्हणोनी भक्तामाजी रावो ।
आणि ज्ञानिया तोचि ।।

सर्वत्र भरून राहिलेले तेच एकमेव ब्रह्मतत्त्व आहे. तेच चैतन्य आहे. त्या चैतन्याची आराधना हीच परमात्म्याची पूजा होय. हेच चैतन्य प्रत्येक जीवमात्रात वास करीत आहे. म्हणूनच जीवाजीवातील चैतन्याची अनुभूती जेव्हा ज्ञानदेवांना झाली तेव्हा तीच अनुभूती 'चिद्विलास' तत्त्वातून उभी राहिली. ज्ञानदेवांनी एक सुंदर दृष्टांत दिला आहे...

सुवर्णाचे मणि केले। तेच सोनियाचे सुती ओविले ।
जैसे म्या जग धरिले । सबाह्याभ्यंतरी ।

सोन्याचे मणी करावेत आणि सोन्याच्या सुतात ओवावेत मग काय वर्णावे? मणीही सोनेच आणि सुतही सोन्याचेच.

सुवर्णाशिवाय दुसरे काही नाही. त्याप्रमाणे विश्व हा परमात्म्याचा विलास आहे. जग हे परमात्म्याने भरले आहे आणि परमात्माच संपूर्ण विश्वात भरून उरला आहे.

ज्ञानेश्वर महाराज हे रामानुजाप्रमाणे विशिष्टाद्वैती अथवा वल्लभाचार्याप्रमाणे शुद्धाद्वैती नव्हते तर 'अवघेचित आत्मा' सांगणारे अद्वैती होते. जो भक्त मला सर्वत्र पाहतो आणि माझ्या ठायी सर्वांना पाहतो त्याच्या ठायी ऐक्याच्या भूमिकेतून मी सर्व भूतांत सारखाच व्यापून राहिलो आहे. त्यामुळे जीवाजीवातील भेदानेही त्याच्या ठायी द्वैती उत्पन्न होत नाही. 'वासुदेवः सर्वमिति' या वचनाची अनुभूती हीच आहे.

ज्ञानदेवांच्या या विचारातून सकल संतांनी परमात्म्यांचे विश्व उभे केले आणि विश्वाबरोबरच जीवाशिवातील परमात्मा शोधला. त्यातूनच 'जनता जनार्दन' ही संकल्पना रुजली गेली. चिद्विलास तत्त्व मांडून ज्ञानदेवांनी भागवतधर्माला तत्त्वज्ञानाची बैठक दिली तर विश्व, त्यातील चैतन्य आणि परमात्मस्वरूप याची अनुभूती चिद्विलासातून मांडली गेली.

आपले शुद्ध कर्म करीत जो नैतिक जीवन जगतो तो कोणीही त्याचा अधिकारी आहे. परमात्म्याच्या स्वरुपाची ओळख करून घेणे हे जसे आध्यात्माचे प्रयोजन आहे तसेच जीवनातील मूल्ये कृतीत उतरवून मानवाला दिव्याकडे नेणे हे देखील आध्यात्माचे सर्वात मोठे प्रयोजन ठरते. **– किशोर गांधी**

# ऑल इंडिया उलमा बोर्डच्या जिल्हाध्यक्षपदी इम्रान खान



नगर – ऑल इंडिया उलमा बोर्ड (मुतवल्ली विंग) च्या नुतन कार्यकारिणीमध्ये नगर जिल्हाध्यक्ष पदी इंजिनियर इम्रान हाजी अन्वर खान यांची राष्ट्रीय अध्यक्ष शेख फैसल मोहम्मद इकबाल यांनी राष्ट्रीय अध्यक्ष मौलाना नौशाद सिद्दीकी आणि महासचिव अल्लामा बुनई हस्नी यांच्याशी चर्चा करुन निवड केल्याबाबत नियुक्तीपत्र देऊन सन्मानीत केले आहे.

भारतातील महाराष्ट्र सह वक्फ च्या जमीनी जतन करणे संदर्भात ऑल इंडिया उलमा बोर्ड मुतवल्ली विंग ची स्थापना करण्यात आली असुन रेल्वे विभागानंतर भारतात वक्फ ची संपत्ती दुसरे क्रमांकावर येत आहे. या वक्फ जमीनींचे खरे उपयोग समाजहितासाठी झाले तर कोणीही उपाशी आणि बैरोजगार राहणार नाही. यासाठी वक्फ बोर्ड च्या जमीनी चे जतन करने, अनाधिकृत ताबेमारी यासाठी मुतवल्ली, ट्रस्टी, मदरसे, आशुरखाना, कब्रस्तान, चिल्ला, दर्गा, मस्जिद, यतीमखाना अशा प्रकारच्या सर्व प्रकरणात मुतवल्ली, ट्रस्टी यांना होत असलेल्या त्रासाबद्दल लोकशाही मार्गाने आवाज उठविण्यासाठी तसेच वक्फ जमीनी वाचविण्यासाठी प्रयत्न करणेकामी संघटना काम करणार असल्याचे ऑल इंडिया उलमा बोर्ड मुतवल्ली विंग चे राष्ट्रीय अध्यक्ष शेख फैसल मोहम्मद इकबाल यांनी सांगितले आहे.

लवकरच संघटनेची नुतन जिल्हा कार्यकारिणी जाहिर करणार असुन जिल्ह्यातील मदरसे, आशुरखाना, कब्रस्तान, चिल्ला, दर्गा, मस्जिद, यतीमखाना च्या मुतवल्ली ट्रस्टी यांनी संपर्क करुन (मोबा.९०९६७८६२७९) आपले नाव संघटनेत नोंदवावे असे ऑल इंडिया उलमा बोर्ड मुतवल्ली विंग चे नुतन जिल्हाध्यक्ष इंजिनियर इम्रान खान यांनी कळवले आहे.

# स्वराज प्रतिष्ठानच्या वतीने श्रीराम जन्मोत्सव साजरा



दसरेनगर येथील स्वराज प्रतिष्ठानच्या वतीने श्रीराम जन्मोत्सव साजरा करण्यात आला. याप्रसंगी महापौर सौ. ज्योतीताई गाडे आदी. शेजारील छायाचित्रात महाप्रसादाचा लाभ घेताना भाविक.

नगर – शहरातील दसरेनगर परिसरात २६ मार्च रोजी स्वराज प्रतिष्ठानच्या वतीने श्रीराम जन्मोत्सव साजरा करण्यात आला. या सोहळ्याला नागरिकांचा प्रतिसाद मिळाला आणि परिसर भक्तिमय वातावरणाने भारावून गेला. कार्यक्रमाची सुरुवात प्रभू श्रीरामांच्या प्रतिमेच्या पूजनाने झाली. परिसर रामनामाच्या गजराने, भजन–कीर्तनांनी आणि धार्मिक वातावरणाने भरला. उपस्थित भक्तांनी श्रद्धेने सहभाग घेत श्रीराम जन्मोत्सवाचा आनंद लुटला. सोहळ्यात श्री प्रभू रामचंद्र यांची महारती प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते झाली. तसेच महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले. यावेळी आमदार संग्राम जगताप, महापौर ज्योतीताई गाडे, नगरसेविका शितलताई जगताप, रोशनीताई त्रंबके, रूपालीताई वारे, संध्याताई पवार, नगरसेवक निखिल वारे, बाळासाहेब पवार, सुनील त्र्यंबके, विशाल नाकाडे, महेश तवळे, भाजपचे अध्यक्ष अनिल मोहिते आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी किशोर वाणी होते, ज्यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे उत्कृष्ट नियोजन करण्यात आले. प्रमुख उपस्थितांमध्ये बाळकृष्ण नरवडे, भाऊसाहेब आव्हाड, अजित शहाणे, महादेव साबळे, वासुदेव आव्हाड, सारंग शहाणे, तुकाराम मिसाळ, राजू गीते, योगेश जावळे, मयूर सूर्य पुजारी, शेखर बनकर यांचा समावेश होता.

सोहळ्यात विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. रामजन्माच्या पवित्रक्षणी आरती झाली, त्यानंतर प्रसादाचे वितरण करण्यात आले.

महापौर ज्योतीताई गाडे यांनी उपस्थितांना संबोधित करताना म्हणाले की, अशा उपक्रमांमुळे समाजात भक्तिचा वातावरण निर्माण होतो आणि धर्मसंस्कार पिढ्यान् पिढ्या टिकून राहतात.

नगरसेविका शितलताई जगताप म्हणाल्या की, श्रीराम जन्मोत्सवाच्या निमित्ताने लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्वांनी भक्तिभाव अनुभवला. अशा कार्यक्रमांमुळे समाजात संस्कारांची जपणूक होते.

मोहिते म्हणाले की, धार्मिक व सांस्कृतिक उपक्रम समाजात एकता निर्माण करतात. स्वराज प्रतिष्ठानचे हे आयोजन आदर्श ठरले आहे.

# केडगावच्या वैष्णवनगरला योगेश्वरी देवीचा होणार उत्सव



नगर – केडगावमधील वैष्णवनगरमध्ये सालाबादाप्रमाणे २ एप्रिलला चैत्र पौर्णिमेच्या दिवशी हरिद्वारच्या अखिल विश्व गायत्री परिवार शांतीकुज यांच्या प्रेरणेने योगेश्वरी देवीचा उत्सव होणार असुन, त्याची तयारी अंतिम टप्प्यात आली असल्याचे मंदिराचे व्यवस्थापक चंद्रकांत (तात्या) देशमुख यांनी सांगितले आहे. हा सोहोळा तीन दिवस चालणार असुन, याचा सर्वांनी लाभ घ्यावा, असे आवाहनही त्यांनी केले आहे.

१ एप्रिलला सायंकाळी स्वर मंदिर भजनी मंडळ व राजलक्ष्मी भजनी मंडळाचा भजनाचा कार्यक्रम होईल, तर २ एप्रिलला सकाळी नवकुंडीय गायत्री यज्ञ होणार आहे. सायंकाळी वैष्णवनगर च्या मारुती मंदिरापासुन देवीची सवाद्य मिरवणूक काढण्यात येणार आहे. आरतीनंतर महाप्रसादाचा कार्यक्रम होईल असे आयोजक प्रसाद देशमुख यांनी सांगितले.

पुजेचे अधिपत्य संदीप जोशी करणार असुन, या उत्सवास भानुदास कोतकर, आमदार संग्राम जगताप, सचिन कोतकर, नगरसेविका सुरेखा कोतकर उपस्थित असणार आहेत. ३ एप्रिल शुक्रवारी पहाटे कार्यक्रमाची सांगता होईल.

# जगताप परिवाराच्या हातून परमब्रम्हदान असलेल्या 'अन्नदान' कायम होत राहो : अलोकऋषीजी महाराज

नगर – स्व.अरुण जगताप व परिवाराने सर्व साधू संतांशी आपुलकीचे नाते जपले आहे. नगरच्या विकासासाठी खूप चांगले कार्य त्यांनी केले आहे. स्व.अरुण जगताप यांच्या जयंतीनिमित्त अन्नदानाचा स्तुत्य उपक्रम राबवला गेला आहे. अन्नदानास परमब्रम्हदान म्हंटले गेले आहे. असे सामाजिक कार्य जगताप परिवाराच्या हातून कायम होत राहो, अशा मंगलकामना अलोकऋषीजी महाराज यांनी व्यक्त केल्या.



काका ट्रस्टच्या वतीने सुरु करण्यात आलेल्या स्व.अरुणकाका जगताप अन्नछत्रालयाचा शुभारंभ करताना अलोकऋषीजी महाराज व श्री विशाला गणपती देवस्थानचे महंत संगमनाथ महाराज. यावेळी श्रीमती पार्वतीबाई जगताप, महापौर ज्योती गाडे, आ. संग्राम जगताप

## काका ट्रस्टच्या स्व.अरुणकाका जगताप अन्नछत्रालयाचा शुभारंभ

माजी आमदार स्व.अरुणकाका जगताप यांच्या जयंतीनिमित्त काका ट्रस्टच्या वतीने स्व.अरुणकाका जगताप अन्नछत्रालयाचा शुभारंभ अलोकऋषीजी महाराज व ग्रामदैवत श्री विशाल गणपती देवस्थानचे महंत संगमनाथ महाराज यांच्या हस्ते झाले. मार्केटयार्ड जवळील इंद्रप्रस्थ मंगल कार्यालया समोरील नागेश्वर महादेव मंदिरात हे अन्नछत्रालय सुरु करण्यात आले आहे. याठिकाणी दररोज सकाळी ११ ते दुपारी ३ या वेळेत गरजूंना मोफत भोजन मिळणार आहे.

या कार्यक्रमास श्रीमती पार्वतीबाई जगताप, महापौर ज्योती गाडे, भाजपा शहर जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते, आ.संग्राम जगताप, जिल्हापरिषदेचे माजी सदस्य सचिन जगताप व सुवर्णा जगताप, माजी नगरसेविका शितल जगताप, स्थायी समितीचे सभापती सुभाष लोंढे, माजी महापौर भगवान फुलसौंदर, माजी उपमहापौर गणेश भोसले, राजेंद्र चोपडा, किशोर डागवाले, हितेश ओबेरॉय, नगरसेवक, पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी अरविंद शिंदे, राजेंद्र चोपडा, सुहास मुळे, ज्ञानेश्वर रासकर, सुमतीलाल कोठारी, भगवान फुलसौंदर, विजय परदेशी, अजय फुंदे, गणेश कवडे, अविनाश घुले व अनिल मोहिते आदींनी मनोगत व्यक्त करून स्वर्गीय अरुणकाका जगताप यांच्या स्मृती जागवल्या.

सर्वांचे आभार मानताना आमदार संग्राम जगताप म्हणाले, स्व. अरुणकाका जगताप यांनी कायम अन्नदानाला महत्त्व देत विविध उपक्रम राबवले. त्यांच्या पश्चात हा वारसा अखंडितपणे पुढे नेण्यासाठी तसेच गरजूंना मदत व्हावी या उद्देशाने सुरु केलेले हे मोफत अन्नछत्र अखंडितपणे दररोज सुरू राहणार आहे. स्व. अरुणकाकांच्या प्रथम वर्षश्राद्ध दिनी २१ एप्रिल रोजी मोठ्या स्वरूपात अध्यात्मिक व सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन केले आहे. स्व.काकांच्या निधनानंतर सर्व नागरिकांनी जगताप परिवाराला मोठा आधार दिला याबद्दल सर्वांचे आभार मानतो. प्रास्ताविक व सूत्रसंचालन नगरसेवक प्रकाश भागानगरे यांनी केले. काका ट्रस्टचे अनुप काळे यांनी आभार मानले. काका ट्रस्टच्या सर्व सदस्यांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले.



भारतीय जनता पक्षाच्या अनुसूचित जाती मोर्चा जिल्हा उपाध्यक्षपदी किशोर वाने यांची निवड करण्यात आली आहे. निवडीबाबत औपचारिक पत्र जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते यांनी दिले. यावेळी महापौर ज्योतीताई गाडे आदी.

# भारतीय जनता पक्षाच्या अनुसूचित जाती मोर्चा जिल्हा उपाध्यक्ष म्हणून किशोर वाने यांची निवड

नगर – भारतीय जनता पक्षाच्या अनुसूचित जाती मोर्चा जिल्हा उपाध्यक्षपदी किशोर वाने यांची निवड करण्यात आली आहे. निवडीबाबत औपचारिक पत्र जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते यांनी दिले. यावेळी महापौर ज्योतीताई गाडे, नगरसेविका शितलताई जगताप, रोशनीताई त्रंबके, रूपालीताई वारे, संध्याताई पवार, नगरसेवक निखिल वारे, बाळासाहेब पवार, सुनील त्र्यंबके, विशाल नाकाडे, महेश तवले, बाळकृष्ण नरवडे, भाऊसाहेब आव्हाड, अजित शहाणे, महादेव साबळे, वासुदेव आव्हाड, सारंग शहाणे, तुकाराम मिसाळ, राजू गीते, योगेश जावळे, मयूर सूर्य पुजारी, शेखर बनकर उपस्थित होते

अनिल मोहिते यांनी सांगितले, किशोर वाने यांना त्यांच्या कार्यकुशलतेमुळे आणि सेवाभावामुळे ही मान प्राप्त झाली आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली मोर्चा अधिक सशक्त होईल आणि समाजातील प्रत्येक घटकापर्यंत पक्षाचे उद्दिष्ट पोहचेल. पक्षाच्या स्थानिक आणि जिल्हास्तरीय कार्यक्रमांमध्ये किशोर वाने यांचा सतत सक्रिय सहभाग राहिला आहे, आणि जिल्हा उपाध्यक्षपदी निवड झाल्यामुळे मोर्च्याच्या योजनांची अंमलबजावणी अधिक प्रभावी होईल अशी अपेक्षा आहे.

किशोर वाने यांनी यावेळी सांगितले, ही निवड माझ्यासाठी आणि माझ्या कार्यकर्त्यांसाठी अत्यंत अभिमानाची गोष्ट आहे. मी माझ्या सर्व क्षमतेनं समाजातील प्रत्येक घटकासाठी कार्य करून पक्षाच्या उद्दिष्टांची अंमलबजावणी करीन.

# श्रीराम नवमी आणि गुरुवार असा दुहेरी पवित्र योग

**महापौर ज्योतीताई गाडे यांचे प्रतिपादन; साई संघर्ष समितीच्या पुढाकाराने साई मंदिरात भक्ती, महाआरती व महाप्रसादाचा सोहळा**



वसंत टेकडी येथील श्री साई मंदिरात महाआरती व महाप्रसादाचा सोहळा भक्तिमय वातावरणात व उत्साहात झाला.

नगर – श्रीराम नवमी आणि गुरुवार असा दुहेरी पवित्र योग लाभणे ही भाविकांसाठी मोठी भाग्याची बाब आहे. अशा धार्मिक कार्यक्रमांमुळे समाजात एकोपा वाढतो व सकारात्मक ऊर्जा निर्माण होते, असे प्रतिपादन महापौर ज्योतीताई गाडे यांनी केले.

शहरातील वसंत टेकडी येथील श्री साई मंदिरात गुरुवारी महाआरती व महाप्रसादाचा सोहळा भक्तिमय वातावरणात व मोठ्या उत्साहात झाला. विशेष म्हणजे या गुरुवारी श्रीराम नवमीचा पवित्र योग साधला गेल्याने कार्यक्रमाला अधिक धार्मिक महत्त्व प्राप्त झाले.

यावेळी साईभक्त निलेश प्रकाश पालवे व सौ. तेजस्विनी निलेश पालवे यांच्या हस्ते महाआरतीस प्रारंभ करण्यात आला. कार्यक्रमास महापौर ज्योतीताई गाडे, नगरसेविका रोशनी त्र्यंबके उपस्थित होते. वार्ड क्रमांक २ मधील नागरिकांच्या वतीने महापौर व नगरसेविकांचा विशेष सत्कार करण्यात आला.

या महिन्याचे अन्नदाते म्हणून त्र्यंबके परिवार यांनी महाप्रसादाची जबाबदारी स्वीकारली होती. यावेळी माजी नगरसेवक सुनील त्र्यंबके, आकाश त्र्यंबके, योगेश पिंपळे, साई संघर्ष समितीचे सदस्य, पदाधिकारी तसेच भाविक उपस्थित होते. संपूर्ण मंदिर परिसर साईरामच्या जयघोषाने दुमदुमून गेला.

महापौर ज्योतीताई गाडे यांनी यावेळी सांगितले, श्रीराम नवमी आणि गुरुवार असा दुहेरी पवित्र योग लाभणे ही भाविकांसाठी मोठी भाग्याची बाब आहे. अशा धार्मिक कार्यक्रमांमुळे समाजात एकोपा वाढतो व सकारात्मक ऊर्जा निर्माण होते.

सुनील त्र्यंबके यांनी सांगितले, गुरुवार हा साईबाबांचा पवित्र वार असून त्यांच्या कृपेनेच सर्व कार्य यशस्वी होत आहे. तसेच आमदार संग्राम जगताप व सुजय विखे पाटील यांच्या मार्गदर्शनामुळे सामाजिक व धार्मिक उपक्रमांना बळ मिळत असल्याचे त्यांनी नमूद केले.

श्री साई मंदिरात दर महिन्याच्या शेवटच्या गुरुवारी महाप्रसादाचे आयोजन नियमितपणे करण्यात येते. मंदिर विकास व अन्नदानासाठी इच्छुक भाविकांनी स्वेच्छेने देणगी द्यावी, असे आवाहनही यावेळी करण्यात आले.

कार्यक्रमाच्या शेवटी महाप्रसादाचे वितरण करण्यात आले असून सर्व भाविकांनी साईनामात तल्लीन होत प्रसादाचा लाभ घेतला.

# ‘फायनान्शियल मॅनेजमेंट’ विषयात सौ.श्रद्धा गांधी यांना डॉक्टरेट पदवी



नगर – सौ. श्रद्धा शुभम गांधी यांनी ’फायनान्शियल मॅनेजमेंट’ (आर्थिक व्यवस्थापन) या विषयात नुकतीच डॉक्टरेट (Ph.D.) पदवी प्राप्त केली आहे. जळगाव येथील कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात त्यांनी हा शोधप्रबंध केला. २०२१ पासून त्यांनी आपल्या संशोधनाला प्रारंभ केले होते. त्यांच्या या संशोधनामुळे व्यवस्थापन क्षेत्रातील व्यावसायिकांना एक नवा दृष्टिकोन मिळणार असून, भविष्यातील आर्थिक नियोजनासाठी हे कार्य सर्वांना मार्गदर्शक ठरणार आहे.

डॉ. श्रद्धा या नगर येथील आय एम एस कॉलेजमध्ये प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत. हे यश केवळ माझे एकटीचे नसून, माझ्या कुटुंबीयांनी, सहकाऱ्यांनी, मित्रपरिवाराने दिलेल्या पाठिंब्याचे फलित आहे. व्यवस्थापन क्षेत्रातील व्यावसायिकांना माझ्या संशोधनातून नवीन दिशा मिळावी, हाच यामागील मुख्य उद्देश होता, अशी भावना डॉ. श्रद्धा गांधी यांनी व्यक्त केली.

सौ. श्रद्धा गांधी या अ. नगरचे सर्जेपुरातील ऑटोमोबाईल व्यावसायिक वसंतलाल गांधी यांची नातसून आहे. संसारिक आणि अध्यापनातील जबाबदाऱ्या सांभाळून मिळविलेल्या या यशाबद्दल त्यांचे अभिनंदन होत आहे.

# रुग्णसेवा हीच ईश्वरसेवा : महेश मुनोत



श्री आनंदऋषीजी हॉस्पिटल अ‍ॅण्ड हार्ट सर्जरी सेंटरमध्ये महावीर जाप ग्रुपच्या वतीने बालरोग तपासणी शिबिराचे महावीर जाप ग्रुपच्या सर्व सदस्यांच्या हस्ते उद्‌घाटन करण्यात आले. (छाया – उदय जोशी)

नगर – महावीर जाप ग्रुपच्या माध्यमातून सातत्याने हा उपक्रम आम्ही करत आहोत. रुग्णसेवा हीच ईश्वरसवा आहे म्हणून समाजातील दीनदुबळ्यांची सेवा करण्याची संधी आनंदऋषीजी हॉस्पिटलच्या माध्यमातून आम्हाला मिळत आहे हे आमचे भाग्य आहे, असे प्रतिपादन महेश मुनोत यांनी केले. मुले ही उद्याचे भविष्य असल्याने त्यांचे निरोगी आरोग्य महत्वाचे आहे.

जैन सोशल फेडरेशन द्वारा संचलित श्री आनंदऋषीजी हॉस्पिटल अँड हार्ट सर्जरी सेंटरमध्ये राष्ट्रसंत आचार्य श्री आनंदऋषीजी म.सा. यांच्या ३४ व्या पुण्यस्मरणानिमित्ताने महावीर जाप ग्रुपच्या वतीने बालरोग तपासणी शिबिराचे महावीर जाप ग्रुपच्या सर्व सदस्यांच्या हस्ते उद्‌घाटन करण्यात आले. आनंद मुथा, महावीर मुथीयान, अभय पुंगलीया, आनंद पितळे, सुबोध बोथरा, शुभांगी पितळे, पियुष मंडलेचा, प्रदिप नहार, जिग्नेश सोळंकी, महेश मुनोत, महेश गुंदेचा, सौ.सोनाली मुनोत, महेश भळगट, प्रल्हाद जोशी, सुरेंद्र गांधी, सौ.अश्विनी गांधी, जगदिश पटेल, संतोष बोथरा, डॉ.प्रकाश

## बालरोग तपासणी शिबिरात ७० रुग्णांची तपासणी

कांकरिया, डॉ.वसंत कटारिया, माणकचंद कटारिया, अभय गुगळे, सुभाष मुनोत, वसंत चोपडा, प्रकाश छल्लानी, डॉ.वैभवी वंजारे, डॉ. दीपी अग्रवाल, डॉ.विजय साठे, डॉ.गणेश गव्हाणे, डॉ. रूपेश सिकची आदी उपस्थित होते.

महेश भळगट म्हणाले वाढता ताणतणाव, अनियमितता यामुळे आज प्रत्येक जण कोणत्या ना कोणत्या आजाराने त्रस्त आहे परंतु पैशाअभावी त्याकडे दुर्लक्ष करतो जैन सोशल फेडरेशन च्या माध्यमातून रुग्णांना वेळीच उपचार मिळतात व ते बरे होण्यास मदत करतात.

डॉ. गणेश गव्हाणे म्हणाले, आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये जन आरोग्य योजनेच्या माध्यमातून गरजूंना सेवा देण्याचे काम आम्ही सातत्याने करत आहोत कोणताही उपचार वेळीच केल्यास त्याचा रुग्णाला फायदा होतो रुग्ण लवकर बरा होतो. या माध्यमातून लहान मुलांच्या शस्त्रक्रिया, उपचार येथे होत आहेत.

प्रास्ताविकात संतोष बोथरा म्हणाले महावीर जाप ग्रुप हा पार्टी ऐवजी हा आरोग्याच्या या सेवा यज्ञात सातत्याने सहकार्य करत आहे हे महत्वाचे असून चांगले काम घडत आहे समाजातील सर्व घटक एकत्र आल्यामुळेच हे कार्य चालू आहे.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.आशिष भंडारी यांनी केले. प्रकाश छल्लानी यांनी आभार मानले. या शिबीरात सुमारे ७० रुग्णांची तपासणी करण्यात आली.

# ‘कोहिनूर’च्या नाशिक येथील नूतन वस्त्रदालनाचा शुभारंभ



नगरमधील ’कोहिनूर’च्या नाशिक येथील नूतन वस्त्रदालनाचा शुभारंभ करताना बी यू भंडारी समूहाचे जयकुमार भंडारी, निता भाभी गांधी, हरीशभाई मेहता आदी.

नगर – सदा सर्वदा सर्वांसाठी सर्वोत्तम कपडे उपलब्ध करून देण्याची ९ दशकांची परंपरा असलेले नगरमधील कोहिनूर वस्त्रदालन आता धार्मिक नगरी नाशिक येथे रामनवमीच्या मुहूर्तावर २६ मार्च रोजी बी यू भंडारी समूहाचे जयकुमार भंडारी, निता भाभी गांधी, हरीशभाई मेहता यांच्या हस्ते सकाळी १०.३० वाजता शुभारंभ सोहळा पार पडला. कोहिनूरच्या नाशिक येथील नूतन दालनाचे लोकार्पण सोहळा झाला अशी माहिती अश्विन गांधी यांनी दिली.

महाराष्ट्राच्या वस्त्र विश्वात कोहिनूर हा एक मोठा ब्रँड आहे. एम.जी. रोडवरील दालनासह सावेडी रोड येथील कोहिनूरचे दालन कपडे खरेदीसाठी ग्राहकांची पहिली पसंती असते. लग्न बस्त्यासाठी तर शेजारील जिल्ह्यातील ग्राहक कोहिनूर मध्ये आवर्जून येतात. आता ग्राहकांच्या आग्रहाखातर कोहिनूरने नाशिकला कॉलेज रोडवर अतिशय प्रशस्त आणि भव्य दालन उभारले आहे. त्याचा लाभ उत्तर महाराष्ट्रातील ग्राहकांना होणार आहे.

नाशिक येथे कोहिनूर वस्त्रदालन प्रत्येकाच्या खास खरेदीसाठी कपड्यांची मोठी व्हरायटी घेऊन सज्ज झाले आहे. डिझायनर साड्या, पैठणी, सिल्क, आधुनिक फॅशन, प्रिंटेड साड्यांसह महिलांचे रेडिमेडस तसेच पुरूषांसाठी सुटींग, शर्टींग, रेडिमेडस, खास सणासुदीसाठी कुर्ता पायजमा, एथनिक वेअर्स उपलब्ध आहेत. संपूर्ण परिवाराला एकाच छताखाली खरेदीचा पुरेपूर आनंद मिळणार आहे.

कपडे खरेदी प्रत्येकासाठी खास असते. नवीन कपडे घेताना प्रत्येक जण चोखंदळ असतो. हाच कल ओळखून कोहिनूरने सातत्याने नवनवीन व्हरायटीची वस्त्र संपदा ग्राहकांना उपलब्ध करून दिली आहे. लग्नसराईचा बस्ता, वधूवरांसाठीचे खास पेहराव सुध्दा उपलब्ध आहेत. अतिशय निवांत वातावरणात नाशिककरांना कोहिनूर मध्ये मनपसंत खरेदीचा आनंद घेता येणार असून ग्राहकांनी दालनास भेट द्यावी असे आवाहन करण्यात आले आहे.

# सावेडी राजस्थानी परिवारातर्फे गणगौर विवाह सोहळा उत्साहात



नगर – सावेडी राजस्थानी गणगौर परिवारातर्फे प्रथेप्रमाणे चार दिवसीय गणगौर विवाह सोहळा येथील कोहिनूर मंगल कार्यालयात उत्साहात साजरा करण्यात आला. सौ. अश्विनी अमोल सोनी यांनी सावेडी राजस्थानी गणगौर परिवारातर्फे गेल्या ३६ वर्षांपासून गणगौर विवाह सोहळ्याचे आयोजन करण्यात येत आहे, अशी माहिती दिली. त्या म्हणाल्या, प्रतिवर्षी या सोहळ्याच्या अगोदर १६ दिवस आपापल्या घरी कुमारिका गौर पूजा अत्यंत श्रध्देने करतात. ही पूजा गृहिणी म्हणून आपली संस्कृती महिलांना कसा मान देते, हा संस्कार युवतींमध्ये रूजवण्याचे महत्वपूर्ण कार्य करते.

वरपक्षाचे यजमान गोपाल संपदा दमानी तर वधुपक्षाचे यजमान संजय अर्चना पुगलिया दाम्पत्य होते. बाल रूपात ईसर, अद्रिक दीपक भंडारी, गौराद हर्षिता, पवन तापड़िया होते.

कमिटी मेंबर्स सावेडी राजस्थानी गणगौर परिवार अहिल्यानगरच्या प्रतिभा बजाज, कविता भंडारी, अनुप्रीति झंवर, पुष्पा अटल, मोना सोनी, शितल कलंत्री, स्मिता दायमा, कांचन शर्मा, मेघा झंवर, वैष्णवी बजाज आदी उपस्थित होते.

यजमानांच्या हस्ते गण–गौरची विधीवत पूजा करण्यात आली. देवेंद्र दायमा यांनी पूजाविधी केले. कुंकुम, मुंगहात, झालावरणा. बेबिनायक हातधान, माहेरा, संगीतरजनी आणि विवाह सोहळा असे क्रमाने चार दिवस कार्यक्रम झाले.

सावेडी परिसरामधून गण–गौरची वरात काढण्यात आली होती. या वरातीच्या अग्रभागी बॅण्डपथक होते. महादेवांच्या वेशभूषेत आणि पार्वतीमातेच्या वेशभूषेत मुले बग्गीमध्ये विराजमान झाली होती. पारंपारिक राजस्थानी नृत्याचे सादरीकरण करत युवती व महिलांनी वरातीचा मनमुराद आनंद लुटला.

गण–गौर अर्थात शिव पार्वती विवाह सोहळ्यासाठी भाविक महिलांनी परिश्रम घेतले. या सोहळ्यामध्ये सावेडी परिसरातील राजस्थानी परिवारातील स्त्री–पुरुष सहभागी झाले होते. उपस्थित सर्वांनी सात्विक प्रसाद भोजनाचा आस्वाद घेत या शिव पार्वती विवाह सोहळ्याची सांगता केली.

# चक्रवर्ती सम्राट अशोक हेच खरे बौद्ध धम्माचे धम्मदायाद : भगवंतराव गायकवाड



भारतीय बौद्ध महासभा शहर शाखेतर्फे चक्रवर्ती सम्राट अशोक यांची जयंती नालंदा बुद्धविहार, गौतमनगर येथे उत्साहात साजरी करण्यात आली.

नगर – भारतीय बौद्ध महासभा, अहिल्यानगर शहर शाखेतर्फे चक्रवर्ती सम्राट अशोक यांची २३३० वी जयंती नालंदा बुद्धविहार, गौतमनगर येथे उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान केंद्रीय शिक्षक भगवंतराव गायकवाड यांनी भूषविले. शहर, जिल्हा व जिल्हा महिला शाखेचे पदाधिकारी व प्रतिनिधी यावेळी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी आदर्शांचे पूजन करण्यात आले. यानंतर त्रिसरण पंचशील, बुद्ध पूजा, सम्राट अशोक स्फूर्ती गीत तसेच भीमस्मरण व भीम स्तुती घेण्यात आली. उपस्थितांचा यथोचित सन्मान करण्यात आला.

याप्रसंगी महिला जिल्हाध्यक्षा सुनीताताई गायकवाड, अ‍ॅड. विद्याताई शिंदे तसेच रेखाताई भिंगारदिवे यांनी सम्राट अशोक यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकत मार्गदर्शन केले. सरचिटणीस लक्ष्मण माघाडे यांनीही सम्राट अशोक यांच्या जीवनपटाचा आढावा मांडला.

अध्यक्षीय भाषणात भगवंतराव गायकवाड यांनी सम्राट अशोक यांचे बौद्ध धम्मातील योगदान अधोरेखित करत, सम्राट अशोक हेच खरे बौद्ध धम्माचे धम्मदायाद आहेत. त्यांनी आयुष्यभर बौद्ध धर्माच्या प्रचार–प्रसारासाठी कार्य केले. संपूर्ण आशिया खंडात बौद्ध धम्माचा प्रसार घडवून आणत स्तूप, चैत्य, लेणी व मठांची उभारणी केली. भगवान बुद्धांच्या धातूंवर हजारो बौद्ध स्थळांची निर्मिती करून त्यांनी धम्माचा अमूल्य वारसा निर्माण केला. स्वतःच्या मुलांनाही धम्मासाठी अर्पण करून त्यांनी आदर्श निर्माण केला, असे प्रतिपादन केले. तसेच संस्थेचा हा उपक्रम स्तुत्य असल्याचे त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमास जिल्हा संस्कार उपाध्यक्ष भगवंतराव गायकवाड, गोरख केदारे, जिल्हा महिला अध्यक्षा सुनीताताई गायकवाड, शहराध्यक्ष दिपक पाटोळे, सरचिटणीस लक्ष्मण माघाडे, कोषाध्यक्ष विजय चाबुकस्वार, संस्कार उपाध्यक्ष युवराज बनसोड, विजय पाटोळे, मिलिंद घाटेशाही, विजय शिंदे, राजेंद्र पाडळे, संजय डहाणे, शंकर पंडागळे, घोडके, हर्षा पंचमुख, विद्याताई शिंदे, घोडकेताई, रेखाताई भिंगारदिवे, भोसलेताई, बालक–बालिका उपस्थित होते.

सूत्रसंचालन सरचिटणीस लक्ष्मण माघाडे यांनी केले, तर शहराध्यक्ष दिपक पाटोळे यांनी आभार प्रदर्शन केले. कार्यक्रमाचा समारोप ‘सरणंतेय गाथा’ घेऊन करण्यात आला.

# सिव्हील हडको येथे गणगौर विवाह

नगर – सिव्हील हडको येथे जैन समाजाच्यावतीने गणगौर विवाह उत्सव साजरा करण्यात आला. मागील ४० वर्षांपासून सिव्हील हडको येथे गणगौर उत्सव साजरा करण्यात येतो. आनंद महिला मंडळाच्यावतीने चैत्र शुद्ध प्रतिपदेला (गुढी पाडवा) उत्सवाची सुरुवात झाली. पाचव्या दिवशी २३ मार्च रोजी संध्याकाळी जैन धर्मस्थानकापासून गणगौरची सवाद्य मिरवणूक काढण्यात आली. मिरवणूकीत महिला व मुली सहभागी झाल्या होत्या.

बॅण्ड पथकाच्या तालावर महिलांनी गरबा नृत्य सादर केले. मिरवणूक जैन धर्मस्थानकाजवळ आल्यानंतर गणगौर (शिवपार्वती) विवाह झाला. सोमनाथ मुळे यांनी पौराहित्य केले. कन्यादान संतोष कोठारी, प्रिती कोठारी, पौर्णिमा फिरोदिया यांनी केले.

यानंतर स्नेहभोजनाची व्यवस्था करण्यात आली. कार्यक्रमास जैन श्रावक संघाचे पदाधिकारी, अरिहंत युवक मंडळाचे सदस्य व परिसरातील महिला व समाजबांधव उपस्थित होते.

# इंटरक्लास तायक्कांदो चॅम्पियनशिप स्पर्धेत राजविर देशमुख यास सुवर्ण पदक



नगर – भिस्तबाग येथील मिरा प्री स्कूल येथे २६ मार्च रोजी इंटरक्लास तायक्कांदो चॅम्पियनशिप २०२६ स्पर्धेचे आयोजन करण्यात आलेले होते. या स्पर्धेस अहिल्यानगर जिल्ह्यातील विविध क्लासेसच्या खेळाडूंनी सहभाग घेतलेला होता.

अहिल्यानगर येथील सुरेश वाघ यांचे केटायगर्स क्लासेसचा खेळाडू राजविर निलेश देशमुख याने ४० कि.ग्रॅ. वजन गटातून तायक्कांदो खेळात भाग घेतलेला होता. राजविर याने तीन मॅचेस खेळून सुवर्ण पदक पटकावले आहे.

राजविर यास सुरेश वाघ यांचे मार्गदर्शन लाभले. राजविर हा अहिल्यानगर जिल्हा न्यायालयातील अ‍ॅड. निलेश विजयकुमार देशमुख यांचा मुलगा आहे.

# एमआयडीसी परिसरातून क्रेनच्या बॅटऱ्यांची चोरी; गुन्हा दाखल

नगर – एमआयडीसी परिसरातून उभी असलेली क्रेन फोडून दोन महागड्या बॅटऱ्या लंपास केल्याची घटना २३ मार्चच्या सायंकाळ ते २४ मार्चच्या सकाळच्या दरम्यान अंबिका हॉटेल शेजारील भाऊसार फौन्ड्री कंपनीसमोर घडली. याप्रकरणी विशाल बाळासाहेब वेताळ यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली असून पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. फिर्यादी विशाल वेताळ यांची ’जी जे ०३ एच ई ४१९५’ क्रमांकाची क्रेन या परिसरात उभी होती. अज्ञात चोरट्याने क्रेनमधील चायना कंपनीची आणि इन्फी कंपनीची अशा एकूण १० हजार रुपये किमतीच्या दोन बॅटऱ्या चोरून नेल्या आहेत. वेताळ यांनी २५ मार्च रोजी सायंकाळी पोलिसांत धाव घेत तक्रार दिली. त्यानुसार अज्ञात आरोपीविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ३०३(२) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेचा पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक माणिक चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस नाईक पालवे करत आहेत.



जिल्हाधिकारी कार्यालयात दहशतवाद्यांच्या विरोधातील थरारक ’मॉकड्रिल’ राबविताना जिल्हा पोलिस दलातील अधिकारी, कर्मचारी.

# नगरच्या जिल्हाधिकारी कार्यालयात पोलीस दलाचे थरारक ‘मॉकड्रिल’

नगर – जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात संध्याकाळच्या सुमारास अचानक पोलिसांचा मोठा ताफा दाखल झाल्याने नागरिकांमध्ये प्रचंड घबराट पसरली होती. सायरन वाजवत येणाऱ्या गाड्या आणि बंदुकधारी पोलिसांमुळे काही काळ परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. मात्र, हा कोणताही वास्तविक दहशतवादी हल्ला नसून, आपत्कालीन स्थिती हाताळण्यासाठी पोलिसांनी राबवलेली ही एक ’सराव मोहीम’ (मॉकड्रिल) असल्याचे प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले.

या मोहिमेदरम्यान जिल्हाधिकारी कार्यालय परिसराची पूर्णपणे नाकेबंदी करण्यात आली होती. यामध्ये दहशतवाद्यांची भूमिका वठवणाऱ्या डमी व्यक्तींना पकडण्याचे नाट्य पोलिसांनी अत्यंत चपळाईने पार पाडले. कोणत्याही संकटाच्या वेळी पोलीस यंत्रणा किती वेगाने प्रतिसाद देते आणि विविध विभागांमध्ये कसा समन्वय राहतो, याची चाचपणी करणे हा या मोहिमेचा मुख्य उद्देश होता.

या विशेष मोहिमेमध्ये स्थानिक पोलीस प्रशासन, दहशतवाद विरोधी पथक आणि सुरक्षा रक्षकांचा मोठा सहभाग दिसून आला. ही केवळ सराव मोहीम असल्याने नागरिकांनी कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन जिल्हा प्रशासनातर्फे करण्यात आले आहे. पोलिसांच्या या सतर्कतेमुळे नागरिकांनी नंतर सुटकेचा निःश्वास सोडला.

# ‘महिलांच्या सक्षमीकरणासाठी’ मुनोत ट्रस्टचा उपक्रम अत्यंत स्तुत्य

### जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांचे प्रतिपादन; कै. सौ. इचरजबाई हस्तीमलजी मुनोत महिला गौरव पुरस्काराचे वितरण



समाजातील विविध क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांच्या गौरवासाठी कै. सौ. इचरजबाई हस्तीमलजी मुनोत महिला गौरव पुरस्कार २०२६ वितरण सोहळा स्मृतिदिनी पार पडला.

नगर – मुनोत ट्रस्टच्या वतीने महिलांच्या सक्षमीकरणासाठी राबविण्यात येणारा हा उपक्रम अत्यंत स्तुत्य असून, अशा उपक्रमांमुळे समाजात सकारात्मक परिवर्तन घडते, याचा मला विशेष आनंद आहे, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी केले. त्यांनी पुढे महिलांनी विविध क्षेत्रात उल्लेखनीय प्रगती करत समाजाला नवी दिशा दिल्याचेही नमूद केले.

समाजातील विविध क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांच्या गौरवासाठी कै. सौ. इचरजबाई हस्तीमलजी मुनोत महिला गौरव पुरस्कार २०२६ वितरण सोहळा स्मृतिदिनी पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया होते.

नगरमधील महिला विविध क्षेत्रात पुढे येत असून त्यांच्या कार्यामुळे समाज प्रगत होत आहे, असे मत कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या कॅन्टोन्मेंट बोर्डाच्या मुख्य कार्यकारी अधिकारी पल्लवी विजयवंशी यांनी व्यक्त केले. स्त्रीने जिद्दीने उभे राहणे अत्यंत महत्त्वाचे असल्याचेही त्यांनी आपल्या मनोगतात सांगितले.

संस्थेचे विश्वस्त संचालक किशोर मुनोत यांनी पुरस्कार प्राप्त महिलांच्या कार्याचे कौतुक करत त्यांच्या प्रेरणादायी कार्याची दखल घेऊनच हा पुरस्कार प्रदान करण्यात आल्याचे सांगितले. तसेच ते म्हणाले केशरगुलाब परिवारातील व माता पिता कडून फक्त संपत्ती मिळाली नसून संस्कार देखील मिळाले म्हणून ‘मानवतासे बढकर कोई धर्म नही ‘या उक्तीने मी कार्यरत आहे.

महाविद्यालयाचा परिसर संचालिका डॉ. स्वाती मुनोत यांनी प्रास्ताविकात या पुरस्कारामागील उद्दिष्ट स्पष्ट केले.

यावर्षीचा सन्मान डॉ. मार्सिया वॉरेन यांना वैद्यकीय व सामाजिक क्षेत्रातील योगदानासाठी, श्रीमती उषा देशमुख यांना औद्योगिक व शैक्षणिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्यासाठी प्रदान करण्यात आला. त्यांनी पुरस्कार मिळाल्यावर जबाबदारी अधिक वाढते असे सांगत आपला प्रेरणादायी प्रवास मांडला. तसेच समाजातील मुलांना योग्य संस्कार देण्याची गरजही त्यांनी व्यक्त केली.

श्रीमती मीनाताई मुनोत यांना सहकार व पत्रकारिता क्षेत्रातील कार्यासाठी गौरविण्यात आले.

तसेच सौ. रूपाली मुनोत यांना स्नेहालय स्थित स्नेहांकुर दत्तक विधान केंद्रा द्वारे करण्यात येत असलेल्या समाजसेवा क्षेत्रातील योगदानासाठी सन्मानित करण्यात आले. त्यांनी स्नेहांकुरच्या कार्याची माहिती देत हा सन्मान प्रेरणादायी असल्याचे सांगितले.

यावेळी डॉ. मृदुला राहुल मुनोत यांना एमबीबीएसमध्ये गोल्ड मेडल मिळवल्याबद्दल विशेष सन्मान करण्यात आला. कार्यक्रमास केशरचंद गुलाबचंद मुनोत नेवासकर सार्वजनिक ट्रस्टचे सचिव लालचंद मुनोत, प्रकाश मुनोत व आनंदराम मुनोत, सौ. सुजाता किशोर मुनोत, प्राचार्य डॉ. खासेराव शितोळे, खटअउ सदस्य, अहमदनगर मर्चंट को–ऑपरेटिव्ह बँकेचे पदाधिकारी, उद्योजक, विद्यार्थी, प्राध्यापक उपस्थित होते.

सूत्रसंचालन सौ. वीणा दिघे यांनी केले. डॉ. वर्षा कीर्तने यांनी आभार प्रदर्शन केले.

विज्ञानविश्वाची माहितीपूर्ण रंजक सफर

# विज्ञानवार्ता

## बाजरी : हिवाळ्यातले सुपरफूड

हिवाळा ऋतूचे आगमन झाले आहे. प्रत्येक ऋतूनुसार आहारातही बदल करावा लागतो. थंडीच्या दिवसात शरीर उबदार ठेवण्यासाठी आणि रोगप्रतिकारक शक्ती मजबूत करण्यासाठी अनेकजण त्यांच्या आहारात अधिक पौष्टिक आणि उष्ण प्रकृतीच्या पदार्थांचा समावेश करतात. हिवाळ्यात अनेकजण बाजरीसह अनेक पारंपरिक धान्यांचादेखील त्यांच्या आहारात समावेश करतात. बाजरी हे हिवाळ्यातील सुपरफूड मानले जाते. बाजरीचे पदार्थ खाल्ल्याने दिवसभर ऊर्जा मिळते आणि उबदारपणादेखील जाणवतो. बाजरीमध्ये मुबलक प्रमाणात फायबर, लोह, मॅग्नेशियम, प्रथिने आणि अँटीऑक्सिडंटस् असतात. बाजरीचा समावेश




आरोग्यदायी व सकस धान्यात केला जातो. यात आढळणारे पोषक तत्त्व शरीरासाठी फायदेशीर असतात. विशेषतः, हिवाळ्यात बाजरीचे सेवन आरोग्यदायी ठरते, असे तज्ज्ञ सांगतात. एके काळी फक्त ग्रामीण भागातच बाजरी जास्त प्रमाणात खाल्ली जात. मात्र, सध्या लोक तंदुरुस्तीबद्दल अधिक जागरूक होत आहेत. परिणामी, शहरी भागातही अनेक पारंपरिक धान्ये लोकप्रिय होत आहेत. लोक बाजरीच्या भाकरीपासून ते लापशीपर्यंत सर्व काही त्यांच्या आहारात समावेश करतात. आहारतज्ज्ञांच्या मते बाजरीची लापशी ही थंडीच्या दिवसात सेवन करणे अत्यंत फायदेशीर आहे. दररोज सकाळी नाश्त्यात लापशी खाल्ल्याने तुम्हाला दिवसभर ऊर्जा मिळेल आणि आळस येणार नाही. गोड लापशी बनवण्यासाठी तुम्ही त्यात गुळाचा वापर करू शकता.

चवदार व मसालेदार लापशीसाठी तुम्ही विविध भाज्या त्यात मिक्स करू शकता, ज्यामुळे त्याचे पौष्टिक मूल्य आणखी वाढते. हिरवे मूग यात मिक्स केल्याने व्हिटॅमिन बी १२ ची कमतरता दूर होण्यास मदत होते. बाजरीत भरपूर फायबर असते, ज्यामुळे वजन कमी करण्याचा किंवा नियंत्रित करण्याचा प्रयत्न करणाऱ्यांसाठी ते एक उत्तम पर्याय आहे. दररोज एक वाटी बाजरीची लापशी खाल्ल्याने बद्धकोष्ठता आणि गॅसदेखील दूर होतो. ओमेगा-३ मुळे तुमच्या शरीरातील रक्तदाब नियंत्रित करण्यासदेखील मदत करते. आहारतज्ज्ञ यांच्या मते उकडलेली बाजरी खाल्ल्याने अनेक फायदे आपल्या शरीराला होत असतात. याच्या सेवनाने शरीरातील ऊर्जेची पातळी वाढवते आणि आळस दूर होतो. बाजरी पोटासाठी हलकी मानली जाते, ज्यामुळे अल्सर किंवा ॲसिडिटीचा त्रास असलेल्यांसाठी ते फायदेशीर ठरते. बाजरीमधील मॅग्नेशियमचे प्रमाण उच्च रक्तदाब, मधुमेह आणि हृदयरोगाचा धोका कमी करण्यास मदत करते. बाजरी हा एक सुपरफूड आहे, जो तुम्ही तुमच्या आहारात अनेक प्रकारे समाविष्ट करू शकता. लोकांना सामान्यतः बाजरीची भाकरी खायला आवडते, जी स्वादिष्ट आणि फायदेशीर दोन्ही मानली जाते. हिवाळ्यात बाजरीची भाकरी खाल्ल्याने शरीर आतून उबदार राहते. त्यामुळे रक्तातील साखर नियंत्रित होण्यास मदत होते आणि पचन सुधारते. तज्ज्ञांच्या मते तुम्ही दिवसातून बाजरीच्या दोन भाकरी खाऊ शकता. ◆◆◆

## इंका-युगातील स्मारकावर नवा प्रकाश

अँन्डीज पर्वताच्या उंच भागात असलेल्या सुमारे ५,२०० खड्ड्यांच्या एका रहस्यमय इंका-युगातील स्मारकाबाबत एका नवीन अभ्यासात महत्त्वपूर्ण माहिती समोर आली आहे. शेकडो वर्षांपूर्वी हे ठिकाण वस्तू विनिमय आणि हिशेब ठेवण्यासाठी वापरले जात असावे, असे या अभ्यासातून सुचवले जात आहे.

दक्षिण पेरूच्या ॲन्डीजमधील मोंटे सिएर्पे (सर्प पर्वत) नावाच्या पर्वतावर हे खड्डे सुव्यवस्थित जाळीदार रचनेत खोदलेले आहेत. या अभ्यासानुसार, इ. स. १००० ते १४०० या काळात १,००,००० हून अधिक लोकसंख्या असलेल्या शक्तिशाली चीनच्या राजवटीत हे ठिकाण वस्तूंच्या देवाण-घेवाणीचे ठिकाण म्हणून बांधले गेले असावे. १५ व्या शतकात इंका साम्राज्याने जेव्हा चीनचा राज्याला जिंकले, तेव्हा हे 'खड्ड्यांची पट्टी' असलेले ठिकाण स्थानिक समूहांकडून खंडणी आणि कर गोळा करण्यासाठी वापरले गेले असावे, असे लेखकांनी सुचवले आहे.




युनिव्हर्सिटी ऑफ साऊथ फ्लोरिडाचे मानववंशशास्त्रज्ञ आणि अभ्यासाचे सह-लेखक चार्ल्स स्टॅनिश यांनी सांगितले की, पुरातत्त्वशास्त्रज्ञांनी या हजारो खड्ड्यांचे विश्लेषण ड्रोन तंत्रज्ञानाचा वापर करून केले. या तंत्रज्ञानामुळे त्यांना 'खड्ड्यांच्या मांडणीत गणिताची नमुना रचना' आढळून आली. याचा अर्थ, हे खड्डे त्यावेळच्या हिशेब आणि रेकॉर्ड ठेवण्याच्या पद्धतीप्रमाणे विभाग आणि ब्लॉक्समध्ये आयोजित केले गेले होते. मोंटे सिएर्पेवरील हे रहस्यमय खड्डे एका लांब पट्टीत मांडलेले आहेत, जे अनेक छोट्या-छोट्या गटांमध्ये विभागलेले आहेत. या संपूर्ण पट्ट्याची लांबी ०.९ मैल (१.५ किलोमीटर) आहे.

प्रत्येक खड्डा ३ ते ६ फूट (१ ते २ मीटर) रुंद असून, ३ फूट (१ मीटर) पर्यंत खोल आहे आणि काही खड्ड्यांमध्ये दगडांचे अस्तरही आहे. हे ठिकाण १६ व्या शतकातील स्पॅनिश वसाहतीकरणापूर्वीच्या रस्त्यांच्या छेदनबिंदूजवळ आणि एका संरक्षण वस्तीजवळ स्थित आहे. सिडनी विद्यापीठातील पुरातत्त्वशास्त्रज्ञ आणि अभ्यासाचे सह-लेखक जैकब बोंगर्स यांच्या मते, या खड्ड्यांच्या प्रचंड संख्येवरून अनेक वर्षांपासून अनेक वेगवेगळ्या कल्पना मांडल्या गेल्या आहेत : 'मोंटे सिएर्पेच्या उद्देशाबद्दलच्या गृहितकांमध्ये संरक्षण, साठवणूक, हिशेब तसेच पाणी संकलन, धुके जमा करणे आणि बागकाम यांचा समावेश आहे. या ठिकाणाचे कार्य अजूनही अस्पष्ट आहे.' ◆◆◆

## प्राणी विचारशील असतात का?

सी स्टार्स (समुद्री तारे), जेलीफिश, सी अर्चिन (समुद्री साळू) आणि सी ॲनिमोन (समुद्री ॲनिमोन) यांसारख्या प्राण्यांना मेंदू नसतो, तरीही ते शिकार पकडू शकतात, धोका ओळखू शकतात आणि त्यांच्या सभोवतालच्या वातावरणावर प्रतिक्रिया देऊ शकतात. मग याचा अर्थ असा आहे की, मेंदू नसलेले प्राणी विचार करू शकतात?

स्वित्झर्लंडमधील युनिव्हर्सिटी ऑफ फ्रायबर्ग येथील न्यूरोबायोलॉजीचे प्राध्यापक सायमन स्प्रेचर यांच्या मते, 'मेंदू नसणे याचा अर्थ न्यूरॉन्स नसणे असा होत नाही.' समुद्री स्पंज आणि प्लाकोझोअन्स वगळता, सर्व प्राण्यांमध्ये न्यूरॉन्स (चेतासंस्थेतील पेशी) असतात, असे त्यांनी सांगितले. जेलीफिश, सी ॲनिमोन आणि हायड्रा यांसारख्या प्राण्यांमध्ये 'डिफ्यूज नर्व्ह नेटस' (विखुरलेली चेतापेशींची जाळी) असते. ही एकमेकांशी जोडलेल्या न्यूरॉन्सची जाळी त्यांच्या संपूर्ण शरीरात आणि सोंडामध्ये पसरलेली असते, असे हैफा विद्यापीठातील (इस्रायल) तामार लोटान यांनी सांगितले.



लोटान यांच्या म्हणण्यानुसार, ही 'नर्व्ह नेट' संवेदी माहितीवर प्रक्रिया करू शकते आणि संघटित हालचाल प्रतिक्रिया (उदा. पोहणे, आकुंचन, खाणे आणि डंख मारणे) निर्माण करू शकते. 'यामुळे मेंदू नसतानाही माहितीचे प्रभावी एकत्रीकरण होते,' असे त्यांनी स्पष्ट केले. हे सोपे सेटअप आश्चर्यकारकपणे प्रगत वर्तनाला आधार देऊ शकते. प्रोफेसर स्प्रेचर यांच्या टीमने दाखवून दिले की, स्टारलेट सी ॲनिमोन सहयोगी स्मृती तयार करू शकतात, म्हणजे दोन असंबंधित उत्तेजनांना जोडायला शिकू शकतात.

एका प्रयोगात, संशोधकांनी सी ॲनिमोनला निरुपद्रवी प्रकाशाची चमक आणि हलका धक्का यांची सांगड घालायला शिकवले. शेवटी, फक्त प्रकाश दिसल्यावरही ते आकुंचन पावले. दुसऱ्या एका प्रयोगात, सी ॲनिमोन पुनरावृत्ती झालेल्या भेटीनंतर त्यांच्या आनुवंशिकरीत्या समान असलेल्या शेजाऱ्यांना ओळखायला शिकू शकतात आणि त्यांची नेहमीची प्रादेशिक आक्रमकता कमी करू शकतात. आनुवंशिकदृष्ट्या समान शेजाऱ्यांप्रति सी ॲनिमोन आपले वर्तन बदलतात, याचा अर्थ ते 'मी' आणि 'इतर' यांच्यात फरक करू शकतात.

जर्मनीतील किएल युनिव्हर्सिटीचे न्यूरोबायोलॉजिस्ट जॅन बिलेकी यांच्या नेतृत्वाखालील एका अभ्यासात असे दिसून आले की, बॉक्स जेलीफिश दृश्यात्मक संकेतांना वस्तूंवर आदळण्याच्या शारीरिक संवेदनांशी जोडू शकतात. यामुळे त्यांना अडथळ्यांभोवती अधिक प्रभावीपणे नेव्हिगेट करण्यास मदत होते. बिलेकी यांच्या मते, 'एकट्या न्यूरॉन्सद्वारे देखील शिकणे साध्य केले जाऊ शकते, यावर माझा पूर्ण विश्वास आहे.' मग, ज्या प्राण्यांना मेंदूऐवजी फक्त 'नर्व्ह नेटस' आहेत, ते अनुभवातून लक्षात ठेवू शकतात आणि शिकू शकतात, याचा अर्थ ते विचार करू शकतात का? हा प्रश्न अजूनही संशोधनाच्या केंद्रस्थानी आहे. ◆◆◆

## कहाणी 'योद्धा मगर'ची

डायनासोरच्या युगापूर्वी, सुमारे २४० दशलक्ष वर्षांपूर्वी ट्रायासिक कालखंडात, ब्राझीलमध्ये वावरणाऱ्या एका महाकाय 'योद्धा सरड्याचा' शोध संशोधकांनी लावला आहे. हा शोध डायनासोर पृथ्वीवर वर्चस्व गाजवण्यासाठी येण्यापूर्वीच्या काळातील माहितीतील अंतर भरून काढतो आणि आता आफ्रिका आणि दक्षिण अमेरिका यांच्यातील संबंधांवर अधिक प्रकाश टाकतो.

हा चिलखतधारी सरपटणारा प्राणी डायनासोरसारखा दिसत असला, तरी तो प्रत्यक्षात आधुनिक मगरींचा पूर्वज आहे. शास्त्रज्ञांनी या प्राण्याला टी. बेलॅटॉर (Tainrakuasuchus bellator) असे नाव दिले आहे. हे नाव ग्रीक, लॅटिन आणि मूळ ब्राझिलियन गुआरानी भाषेतील शब्दांचे मिश्रण असून, याचा अर्थ 'तीक्ष्ण दातांचा योद्धा मगर' असा होतो. संशोधन टीमने १३ नोव्हेंबर रोजी 'जर्नल ऑफ सिस्टिमॅटिक पॅलेऑन्टोलॉजी' मध्ये प्रकाशित केलेल्या एका अभ्यासात या शोधाची माहिती दिली. 'या शोधामुळे जीवनाच्या इतिहासातील एका महत्त्वाच्या क्षणाबद्दल माहिती मिळते, जो डायनासोरच्या उदयापूर्वीचा काळ होता,' असे या अभ्यासाचे मुख्य लेखक आणि ब्राझीलमधील 'फेडरल युनिव्हर्सिटी ऑफ सान्ता मारिया' येथील जीवाश्मशास्त्रज्ञ रोड्रिगो टेंप मुल्लर यांनी एका निवेदनात सांगितले.




ट्रायासिक कालखंडात (२५२ दशलक्ष ते २०१ दशलक्ष वर्षांपूर्वी) जमिनीवर राहणाऱ्या पृष्ठवंशीय प्राण्यांवर आर्कोसॉरचे वर्चस्व होते. या नावाचा अर्थ 'राज्य करणारे सरपटणारे प्राणी' असा आहे आणि त्याचे दोन मुख्य गट आहेत. पहिला गट, ऑर्निथोसुकिया, यातून पक्षी आणि डायनासोर उत्क्रांत झाले. दुसरा गट, स्यूडोसुचिया, यातून आधुनिक मगरींसारखे क्रोकोडिलियन उत्क्रांत झाले. 'टी-बेलॅटॉर' हा स्यूडोसुचिया गटातील आहे. या प्राण्याची लांबी सुमारे ७.९ फूट (२.४ मीटर) आणि वजन १३० पौंड (६० किलोग्रॅम) होते. त्याची मान लांब आणि पातळ जबडा तीक्ष्ण दातांनी भरलेला होता. टी. बेलॅटॉर ज्या प्रकारच्या स्यूडोसुचिया (ज्यांना पोपोसोरोइडसब म्हणतात) गटातील आहे, त्यांचे फार कमी जीवाश्म दक्षिण अमेरिकेत सापडले आहेत, असे संशोधकांनी नमूद केले. मे महिन्यात ब्राझीलमधील डोना फ्रान्सिस्का नगरपालिकेमध्ये उत्खनन करताना टीमला टी. बेलॅटॉरचा अर्धवट सांगाडा सापडला, ज्यात खालचा जबडा, पाठीचा कणा यांचा समावेश आहे. या सरपटणाऱ्या प्राण्याची पाठ ऑस्टिओडर्म्स नावाच्या हाडांच्या प्लेटस्ने झाकलेली होती, जी आधुनिक मगरींमध्येही आढळतात. ◆◆◆

## 'मायक्रोवेव्ह ब्रेन' चिप घडवणार नवी क्रांती

कॉर्नेल विद्यापीठातील अभियंत्यांनी जगातील पहिले 'मायक्रोवेव्ह ब्रेन' तयार केले आहे. ही एक क्रांतिकारी मायक्रोचिप आहे जी पारंपरिक डिजिटल सर्किटस्ऐवजी मायक्रोवेव्हचा वापर करून गणना करते. ही लहान, कमी-शक्तीची प्रोसेसर चिप सिग्नल डिकोडिंग, रडार ट्रॅकिंग आणि डेटा विश्लेषण यांसारखी कामे वास्तविक वेळेत करते आणि त्यासाठी २०० मिलिवॅटपेक्षा कमी ऊर्जा वापरते.

कॉर्नेल विद्यापीठाच्या शास्त्रज्ञांनी 'मायक्रोवेव्ह ब्रेन' नावाचा एक नवीन प्रकारचा कमी-शक्तीचा मायक्रोचिप तयार केला आहे, जो मायक्रोवेव्हच्या अद्वितीय गुणधर्मांचा वापर करून अल्ट्राफास्ट डेटा आणि वायरलेस कम्युनिकेशन सिग्नल दोन्हींवर प्रक्रिया करण्यास सक्षम आहे. 'नेचर इलेक्ट्रॉनिक्स' जर्नलमध्ये नुकत्याच वर्णन केलेल्या या प्रोसेसरमध्ये, सिलिकॉन चिपवर थेट तयार केलेले हे पहिले पूर्णपणे कार्यक्षम मायक्रोवेव्ह न्यूरल नेटवर्क आहे. रेडिओ सिग्नल डिकोडिंग, रडार ट्रॅकिंग आणि डिजिटल डेटा प्रोसेसिंग यांसारख्या गुंतागुंतीच्या कामांसाठी ते फ्रीक्वेन्सी डोमेनमध्ये वास्तविक-वेळेत गणना करते आणि यासाठी २०० मिलिवॅटपेक्षा कमी वीज वापरते.



'हा प्रोसेसर विस्तृत बँड-फ्रीक्वेन्सीमध्ये तत्काळ, प्रोग्रामेबल पद्धतीने विकृत होऊ शकतो, ज्यामुळे याचा वापर अनेक कॉम्प्युटिंग कार्यांसाठी करता येतो,' असे प्रमुख लेखक बाल गोविंद (डॉक्टरेट विद्यार्थी) यांनी सांगितले. ते पुढे म्हणाले, 'डिजिटल कॉम्प्युटर्सला सामान्यतः ज्या मोठ्या प्रमाणात सिग्नल प्रोसेसिंग पायऱ्या कराव्या लागतात, त्या या चिपमुळे टाळल्या जातात.' या चिपची उत्कृष्ट कार्यक्षमता तिच्या आर्किटेक्चरमुळे आहे, जे मानवी मेंदूपासून प्रेरित असलेल्या न्यूरल नेटवर्कसारखे कार्य करते. पारंपरिक न्यूरल नेटवर्क्स जे डिजिटल ऑपरेशन्स आणि क्लॉक-वेळेनुसार चालणाऱ्या सूचनांवर अवलंबून असतात, त्याच्या विपरीत, ही प्रणाली ॲनालॉग मायक्रोवेव्ह श्रेणीमध्ये कार्य करते. यामुळे चिप दहापट गिगाहर्ट्झच्या डेटा स्ट्रीमवर प्रक्रिया करू शकते, जे बहुतेक डिजिटल प्रोसेसरच्या गतीपेक्षा खूप जास्त आहे.'बालने हे साध्य करण्यासाठी अनेक पारंपरिक सर्किट डिझाइन पद्धती सोडून दिल्या,' असे अभियांत्रिकीचे प्राध्यापक ॲलिसा ॲपसेल यांनी सांगितले. 'डिजिटल न्यूरल नेटवर्कच्या संरचनेची तंतोतंत नक्कल करण्याचा प्रयत्न करण्याऐवजी, त्याने नियंत्रित फ्रिक्वेन्सी वर्तनाचा लगदा तयार केला, जो शेवटी उच्च-कार्यक्षमतेची गणना देऊ शकतो. ◆◆◆

## इस्रायलमध्ये सापडला प्राचीन 'चहाचा सेट'

इस्रायलमधील अरमॅगेडॉन (प्राचीन मेगिद्दो शहर) या प्राचीन शहराजवळ उत्खनन करताना, पुरातत्त्वशास्त्रज्ञांना ३,३०० वर्षे जुना कनानी 'चहाचा सेट', बाहुल्यांच्या घराच्या आकाराचे एक मंदिर आणि जगातील सर्वात जुन्या द्राक्षरस काढण्याच्या घाण्यांपैकी एक सापडला आहे.



उत्तर कांस्ययुगात एकत्र पुरलेल्या या 'चहाच्या सेट'मध्ये मेंढ्याच्या आकाराचे टीपॉट आणि काही लहान वाडगे समाविष्ट आहेत. टीपॉटच्या नळीवर मेंढ्याचे डोके कोरलेले आहे. द्रव पदार्थ मेंढ्याच्या तोंडातून बाहेर पडावा, यासाठी हे डोके थोडे पुढे झुकलेले होते.


इस्रायल पुरातन वस्तू प्राधिकरणाने दिलेल्या निवेदनात संशोधकांनी म्हटले आहे की, 'हे भांडे दूध, तेल, द्राक्षारस किंवा इतर कोणतेही मौल्यवान पेय ओतण्यासाठी बनवले असावे. ते थेट नळीतून प्यायले जाऊ शकते, किंवा पिण्यासाठी लहान भांड्यात ओतले जाऊ शकते किंवा ते धार्मिक कार्यासाठी अर्पण म्हणून वापरले जाऊ शकते.' मेंढी, गाढवे आणि शेळ्यांसारखे प्राणी कनानमध्ये अत्यंत मौल्यवान मानले जात होते आणि कनानी लोकांनी हे टीपॉट आणि वाडगे धार्मिक विधींसाठी अर्पण म्हणून पुरले असावेत.

उत्खननादरम्यान सापडलेले, मातीचे (सिरॅमिक) बनवलेले मिनी-मंदिर देखील ३,३०० वर्षे जुने आहे. 'आयएए'चे उत्खनन संचालक आमिर गोलानी यांनी सांगितले की, 'कनानी उत्तर कांस्ययुगातील खरी मंदिरे कशी दिसत असतील, याचे हे उत्कृष्ट उदाहरण आहे.' या उत्खननात अनेक लहान खड्ड्यांमध्ये साठवणुकीसाठी वापरले जाणारे रांजण आणि सायप्रसवरून आयात केलेले जग यांसारखी इतर कनानी धार्मिक अर्पणे देखील सापडली. जे लोक शहरात किंवा जवळच्या मेगिद्दो टेकडीवरील कनानी मंदिरात प्रवेश करू शकत नव्हते, अशा स्थानिक लोकांनी, उदा. शेतक?यांनी, ही अर्पणे पुरली असावीत. मंदिरात प्रवेश न मिळाल्याने, त्यांनी खडकाच्या उंचवट्यावर ही अर्पणे आणि कदाचित शेतीत पिकवलेला मालही पुरला असावा, जो मैदानी वेदी म्हणून वापरला जात असावा, असे निवेदनात नमूद आहे. ◆◆◆

## समुद्रावर धावणारी शेवटची 'ट्रेन फेरी'

तुम्ही अनेकदा रेल्वेने प्रवास केला असेल किंवा ट्रेनला पूल आणि उड्डाणपुलावरून जाताना पाहिले असेल; पण तुम्ही कधी समुद्रात चालणारी ट्रेन पाहिली आहे का? ही ट्रेन पाहणाऱ्यांना, अगदी विज्ञान शिकणाऱ्यांनाही विचार करण्यास लावते. सोशल मीडियावर व्हायरल होत असलेला व्हिडीओ जर्मनी ते डेन्मार्क दरम्यान धावणाऱ्या 'बर्ड फ्लाईट लाईन' या ट्रेनचा आहे.

व्हायरल व्हिडीओमध्ये दिसते की, ही संपूर्ण ट्रेन एका मोठ्या फेरीवर (जहाज) चढून पाण्यावरून जात आहे. ही सेवा जगातील शेवटची प्रवासी ट्रेन फेरी सेवा आहे, जी जर्मनीमधून डेन्मार्कपर्यंत १९ किलोमीटरचा बाल्टिक समुद्र पार करते. व्हिडीओमध्ये दिसते की, ट्रेन प्लॅटफॉर्मवरून बाहेर पडून थेट एका विशाल फेरीच्या आत प्रवेश करते. त्यानंतर फेरीचे इंजिन सुरू होते आणि ट्रेन समुद्रातून पुढे जाते. ही स्कॅन्डलाईन्स कंपनीची फेरी आहे, जी दर अर्ध्या तासाने उपलब्ध असते. या फेरीवर ट्रेनसह कार आणि ट्रक देखील लोड केले जातात. जर्मनी ते डेन्मार्कपर्यंतचा १९ किलोमीटरचा हा प्रवास अवघ्या ४५ मिनिटांत पूर्ण होतो; पण या प्रवासाचा अनुभव आयुष्यभर लक्षात राहतो.



या प्रवासादरम्यान प्रवासी ट्रेनमधून उतरून फेरीवर असलेल्या रेस्तराँमध्ये जेवण करू शकतात. येथे खरेदी करण्याची सोय देखील आहे. डेकवर उभे राहून प्रवासी समुद्राच्या लाटांसोबत सेल्फी काढतात आणि डॉल्फिन पाहण्याचा आनंद घेतात. व्हिडीओ पाहताना असे वाटते की, ट्रेन पाण्यावर उडून जात आहे! ही वोगेलफ्लुगलिनी म्हणजेच 'बर्ड फ्लाईट लाईन' सेवा १९६३ पासून कार्यरत आहे. ट्रेनचा हा अप्रतिम व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. ◆◆◆

## धूम गाढविणीच्या दुधाच्या साबणाची!

आतापर्यंत तुम्ही चंदन, कोरफड, कडूनिंब, गुलाब अशा अनेक सुगंधी साबणांचा वापर केला असेल. पण, तुम्ही कधी गाढविणीच्या दुधापासून बनवलेल्या साबणाने आंघोळ केली आहे का? हे ऐकून आश्चर्य वाटेल; पण हे सत्य आहे! जगभरातील अनेक देशांमध्ये सध्या गाढविणीच्या दुधापासून बनवलेल्या साबणाची मागणी मोठ्या प्रमाणावर वाढत आहे. लोक हा साबण मोठ्या प्रमाणात खरेदी करत आहेत आणि वापरत आहेत.

संयुक्त अरब अमिराती आणि इतर अनेक देशांमध्ये गाढविणीच्या दुधाचे साबण मोठ्या प्रमाणात विकले जात आहेत. याचे कारण काय आहे, याचे कुतूहल सर्वांनाच असू शकते. गाढविणीच्या दुधात भरपूर प्रमाणात खनिजे आणि प्रथिने आढळतात, असा दावा केला जातो. यामध्ये मोठ्या प्रमाणात अँटिऑक्सिडंटस् देखील असतात, जे त्वचेसाठी खूप फायदेशीर आहेत. हा साबण त्वचेला सूर्यप्रकाश आणि वाढत्या वयामुळे होणारे परिणाम कमी करण्यास मदत करतो.



याव्यतिरिक्त, तो त्वचेतील आर्द्रता टिकवून ठेवण्यास मदत करतो. एका मीडिया रिपोर्टनुसार, अटन डॉंकी मिल्क सोप नावाच्या एका कंपनीने दावा केला आहे की, ते त्यांच्या फार्ममध्ये १०० टक्के नैसर्गिक साबण बनवतात. त्यांच्या फार्ममध्ये १२ गाढवे आहेत. जॉर्डनची राजधानी अम्मान येथे या कंपनीची उत्पादन कार्यशाळा आहे आणि तेथे गाढविणीच्या दुधाच्या साबणाला मोठी मागणी आहे. दुबईमध्ये तर गाढविणीच्या दुधापासून बनवलेले विविध ब्रँडस्चे साबण मोठ्या प्रमाणावर विकले जातात.

जेव्हा हा साबण सुरुवातीला जॉर्डनमध्ये लॉन्च करण्यात आला, तेव्हा तेथील लोकांनी त्याची खूप थट्टा केली होती; पण जसजसे लोकांना त्याचे फायदे समजू लागले, तसतशी या साबणाची मागणी वाढू लागली. मीडिया रिपोर्टनुसार, एका शोधामुळे माहिती मिळाली की, गाढविणीचे दूध त्वचेच्या पेशींना पुन्हा जिवंत करण्यास, एक्झिमा सारख्या त्वचेच्या समस्या बऱ्या करण्यास आणि वाढत्या वयाच्या खुणा कमी करण्यास मदत करते. पर्यावरण कार्यकर्ते आणि सेवानिवृत्त शिक्षक अल जुबी यांनी सांगितले की, गाढविणीच्या दुधापासून बनवलेल्या साबणाने आंघोळ केल्यास त्वचेवरील डाग, मुरुमे आणि सुरकुत्या यांसारख्या समस्या कमी होतात आणि त्वचेतील आर्द्रतेची पातळी नियंत्रित राहते. हा साबण गाढविणीच्या दुधात ऑलिव्हचे तेल, बदामाचे तेल आणि नारळाचे तेल मिसळून तयार केला जातो. ◆◆◆

# सर्व गुन्हे माफ करणारे एकमेव न्यायालय म्हणजे आई-बाप

**वैभव ढुस यांचे प्रतिपादन; भगवान महावीर व्याख्यानमाला - पुष्प सहावे**

नगर - सर्व गुन्हे माफ करणारे एकमेव न्यायालय म्हणजे आई-बाप होत, असे प्रतिपादन वैभव ढुस (देवळाली प्रवरा) यांनी केले.

राष्ट्रसंत आचार्य सम्राट श्री आनंदऋषीजी महाराजांच्या ३४ व्या पुण्यस्मृतीदिनानिमित्त जैन सोशल फेडरेशनतर्फे आदर्शऋषीजी म.सा. यांच्या प्रेरणेने येथील आनंदधाममध्ये आयोजित करण्यात आलेल्या भगवान महावीर व्याख्यानमालेचे सहावे पुष्प गुंफताना आत्मविश्वासाने प्रगती या विषयावर ते बोलत होते. सिमा मुनोत यांनी स्वागत केले. सिमरन मुनोत यांनी परिचय करून दिला. श्रीमती इमरतबाई मुनोत (नेवासावाला), यश मुनोत, राहुल मुनोत यांच्या हस्ते वक्त्यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी सुरेश कटारिया, संतोष गांधी, रमेश भंडारी, संजय गांधी आदी उपस्थित होते. सपना कटारिया यांनी आभार मानले.





राष्ट्रसंत आचार्य सम्राट श्री आनंदऋषीजी महाराजांच्या पुण्यस्मृतीदिनानिमित्त जैन सोशल फेडरेशनतर्फे आदर्शऋषीजी म.सा. यांच्या प्रेरणेने येथील आनंदधाममध्ये आयोजित भगवान महावीर व्याख्यानमालेचे सहावे पुष्प गुंफताना वैभव ढुस.

श्री.ढुस पुढे म्हणाले, आई झाल्याशिवाय आई कळत नाही. बाप झाल्याशिवाय बाप कळत नाही. आपण जीवनातील मार्गावर चालायला सुरुवात केली की, पुढचा मार्ग दिसत जातो. हुशार व्यक्तींसोबत, ज्ञानवंतांसोबत आणि विचारवंतांसोबत आपण राहिलो तरी स्वतःला सिद्ध करण्यासाठी कार्य प्रवृत्त व्हावेच लागते. आपल्या कौशल्यावरच जगणं सुकर होत जाते.

आपल्या मुलांना पुस्तकी ज्ञानाबरोबरच व्यावहारिक ज्ञान द्या. स्किल डेव्हलपमेंटवर भर द्या. आज १६ वर्षाच पोरगं म्हणतंय मी डिप्रेशनमध्ये आहे. ज्याला डिप्रेशनचं स्पेलिंगही नीट लिहिता येत नाही. सोशल मीडियामुळे आजच्या तरुण पिढीत डिप्रेशनचे प्रमाण वाढले आहे. सोशल मीडियाकडून आपण काय घेतो? हे महत्त्वाचे! आपली विचारसरणी सोशल मीडियाने बदलली नाही ना? याचे गांभीर्याने चिंतन करा, असे आवाहन वैभव ढूस यांनी केले.

व्याख्यानास शहरासह उपनगरातील स्त्री-पुरूष श्रोत्यांची उपस्थिती होती.

# अहिल्यानगर जिल्ह्यात सुट्या पेट्रोल - डिझेल विक्रीवर बंदी

## जिल्हाधिकाऱ्यांचे आदेश

नगर - समाजमाध्यमांवर पेट्रोल व डिझेलच्या तुटवड्याबाबत पसरत असलेल्या अफवांच्या पार्श्वभूमीवर, कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी व सार्वजनिक सुरक्षेच्या दृष्टिकोनातून अहिल्यानगरचे जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी महत्त्वपूर्ण आदेश जारी केले आहेत. पेट्रोलियम नियम २००२ मधील तरतुदींचा आधार घेत काढण्यात आलेले हे आदेश तात्काळ प्रभावाने लागू करण्यात आले आहेत. या नव्या आदेशानुसार संपूर्ण जिल्ह्यात उघड्यावर म्हणजे कॅन, बाटली किंवा डब्यात पेट्रोल आणि डिझेल देण्यावर कडक निर्बंध लादण्यात आले आहेत.

या आदेशानुसार जिल्ह्यातील सर्व पेट्रोल पंप चालकांनी पेट्रोल आणि डिझेल केवळ वाहनांच्या इंधन टाकीतच भरावे, असे स्पष्ट करण्यात आले आहे. कोणत्याही परिस्थितीत पेट्रोल किंवा डिझेलची खुल्या स्वरूपात म्हणजेच प्लास्टिक बाटली, कॅन, डबा किंवा इतर कोणत्याही भांड्यात विक्री करू नये, अशी सक्त मनाई करण्यात आली आहे. यासोबतच प्रशासनाने सर्व पेट्रोल पंप परिसरातील सीसीटीव्ही यंत्रणा कार्यरत ठेवणे आणि इंधन विक्रीच्या नोंदी नियमितपणे ठेवणे बंधनकारक केले आहे.

या आदेशाचे काटेकोर पालन करण्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित पेट्रोल पंप मालक आणि व्यवस्थापक यांची राहील. जे कोणी या नियमांचे उल्लंघन करतील, त्यांच्यावर 'पेट्रोलियम नियम २००२', 'भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३' तसेच 'आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५' मधील तरतुदींनुसार दंडात्मक आणि फौजदारी स्वरूपाची कठोर कारवाई केली जाईल, असा स्पष्ट इशारा जिल्हाधिकाऱ्यांनी दिला आहे.

याशिवाय, सर्व पेट्रोलियम कंपन्यांच्या व्यवस्थापकांना जिल्ह्यातील सर्व पेट्रोल पंपांवर इंधनाचा पुरेसा साठा राहील याची दक्षता घेण्याचे निर्देशही प्रशासनाकडून देण्यात आले आहेत.

# 'संदीप वराळ हत्याकांड' प्रकरणात प्रशांत वराळला अटींसह जामीन मंजूर

नगर - अहिल्यानगर येथील विशेष न्यायालयाने 'संदीप वराळ हत्याकांड' प्रकरणात आरोपी क्रमांक २ प्रशांत ज्ञानदेव वराळ याचा नियमित जामीन अर्ज मंजूर केला आहे. विशेष प्रकरण क्रमांक ५६९/२०२० अंतर्गत हा आदेश २४ मार्च २०२६ रोजी विशेष न्यायाधीश ए. एम. पाटील यांनी दिला.

न्यायालयाने समतोल तत्त्वाचा आधार घेत, याच प्रकरणातील इतर सहआरोपींना मिळालेल्या जामिनाचा विचार करून वराळ यांनाही जामीन देण्याचा निर्णय घेतला. २१ जानेवारी २०१७ रोजी पारनेर पोलीस ठाण्यात नोंद झालेल्या गुन्ह्यानुसार, निघोज ग्रामपंचायत चौकात मयत संदीप वराळ व फिर्यादी रंगनाथ वराळ यांची भेट झाली होती. काही वेळानंतर गोडाऊनकडे जात असताना अचानक गोळीबाराचा आवाज आला. फिर्यादीच्या म्हणण्यानुसार, आरोपींनी तलवार, कोयता आणि दगडांनी हल्ला करत पीडितावर गोळीबार केला. परिसरात दहशत निर्माण करण्यासाठी हवेतही गोळीबार करण्यात आल्याचे आरोप आहेत. पूर्वीच्या वैमनस्यातून कट रचून ही हत्या करण्यात आल्याचे पोलिसांचे म्हणणे आहे.

आरोपीचे वकिल ॲड. परिमल फळे न्यायालयात युक्तिवाद करताना सांगितले की, प्रशांत वराळ यांचा या गुन्ह्यात कोणताही सहभाग नाही. ते घटनास्थळी उपस्थित नव्हते, तसेच प्रशांत वराळ यांच्या विरुद्ध कुठलेही ठोस पुरावे नसताना त्याला या गुन्ह्यात गोवलेले आहे. प्रशांत वराळ विरुद्ध केलेली मोक्का अंतर्गत कारवाई सुद्धा कायद्याला अनुसरून नाही. तपास पूर्ण झाला असून आरोपपत्र दाखल झाले आहे, तसेच, कुटुंबाची जबाबदारी लक्षात घेता जामीन देण्याची मागणी करण्यात आली.

सरकारी वकिलांनी जामीनाला जोरदार विरोध करताना नमूद केले की, हा अत्यंत गंभीर आणि नियोजित खून आहे. आरोपीविरोधात प्राथमिक पुरावे उपलब्ध आहेत. आरोपी बाहेर आल्यास साक्षीदारांवर दबाव टाकण्याची शक्यता. तसेच, एका आरोपीचा अजूनही शोध सुरू असल्याचेही नमूद करण्यात आले.

बचाव पक्षाने औरंगाबाद खंडपीठाच्या २२ डिसेंबर २०२२ च्या निर्णयाचा दाखला देत, समान परिस्थितीतील सहआरोपींना जामीन मिळाल्याचे निदर्शनास आणले. न्यायालयाने हा मुद्दा ग्राह्य धरत, सद्य आरोपीची भूमिका देखील तत्सम असल्याचे नमूद केले. आरोपीने उच्च न्यायालय व सर्वोच्च न्यायालयात उपाययोजना सुरू ठेवली होती. त्यामुळे त्याच्या फरार असल्याचा मुद्दा ग्राह्य धरता येत नाही. सहआरोपींप्रमाणेच भूमिका असल्याने समतोल तत्त्व लागू होते.

### 'या' आहेत जामिनाच्या अटी

न्यायालयाने २ लाख रुपयांच्या जातमुचलक्यावर जामीन मंजूर करत विविध अटी घातल्या आहेत. साक्षीदारांशी कोणत्याही प्रकारे संपर्क साधू नये, कोणत्याही व्यक्तीमार्फत साक्षीदारांवर प्रभाव टाकू नये, प्रत्येक महिन्याच्या पहिल्या सोमवारी सकाळी ११ ते दुपारी १ या वेळेत पारनेर पोलीस ठाण्यात हजेरी लावावी. आरोपींच्या वतीने ॲड. परिमल फळे यांनी काम पाहिले. त्यांना ॲड. साक्षी जाधव, ॲड. शुभम राजुरकर ॲड. प्रतीक ढमढेरे, ॲड. आकाश पवार यांनी सहाय्य केले.

# राहुरी पोटनिवडणुक 'भाकप' लढविणार, कॉ. उमेश जोशी यांना उमेदवारी जाहीर

**'बिनविरोध निवडणुकीच्या हालचालींवर सवाल'; कॉ. सुभाष लांडे यांची टीका**

नगर - राहुरी विधानसभा पोटनिवडणूक भारतीय कम्युनिस्ट पक्ष (भाकप) लढविणार असल्याची घोषणा पक्षाच्या वतीने करण्यात आली आहे. भाजप व त्याचे काही मित्र पक्ष ही निवडणूक बिनविरोध करण्याच्या तयारीत असल्याचा आरोप करत, मात्र ज्यांच्यासाठी बिनविरोध करावी त्यांचे योगदान काय? असा सवाल भाकपचे राज्य सचिव कॉ. ॲड. सुभाष लांडे यांनी उपस्थित केला.



बुरुडगाव रोड येथील पक्ष कार्यालयात भाकपच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांची बैठक पार पडली. या बैठकीत राहुरी विधानसभा पोटनिवडणूक लढविण्याचा निर्णय घेण्यात आला. तसेच आयटी इंजिनिअर असलेले युवक कॉ. उमेश जोशी यांना अधिकृत उमेदवारी जाहीर करण्यात आली. यावेळी कॉ. लांडे अध्यक्षस्थानी होते.

बुरुडगाव रोड येथील पक्ष कार्यालयात भाकपच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांची बैठक पार पडली. या बैठकीत राहुरी विधानसभा पोटनिवडणूक लढविण्याचा निर्णय घेण्यात आला. तसेच आयटी इंजिनिअर असलेले युवक कॉ. उमेश जोशी यांना अधिकृत उमेदवारी जाहीर करण्यात आली. यावेळी कॉ. लांडे अध्यक्षस्थानी होते.

या बैठकीस जिल्हा सहसचिव कॉ. ॲड. सुधीर टोकेकर, कॉ. संदीप इथापे, कॉ. ज्ञानेश्वर गायकवाड, कॉ. ज्ञानदेव सहाणे, कॉ. रघुनाथ पवार, प्रताप सहाणे, दशरथ हासे, नारायण मेमाणे, बापू राशिनकर, ज्ञानदेव गायकवाड, सुनील दुधाळे, जफर कुरेशी आदी पदाधिकारी उपस्थित होते.

सध्या कांद्याचे भाव पडले असून, शेतकरी वर्ग प्रचंड तणावात आहे. अशा परिस्थितीत शासनाने प्रत्येक शेतकऱ्याला अनुदान द्यावे. तसेच युद्धाच्या परिणामी गॅसच्या किमतीत वाढ करण्यात आली आहे, ती ताबडतोब रद्द करण्यात यावी अशी मागणी कम्युनिस्ट पक्षाच्या वतीने करण्यात आली आहे.

अध्यक्षीय भाषणात कॉ. सुभाष लांडे म्हणाले की, राहुरी हा कम्युनिस्ट पक्षाचा बालेकिल्ला राहिला आहे. १९७२ साली पी.बी. कडू पाटील हे आमदार म्हणून निवडून आले होते. या भागातून खंडकरी व शेतकरी चळवळी उभ्या राहिल्या आहेत. त्यामुळे शेतकरी, कामगार आणि कष्टकरी वर्गाच्या प्रश्नांवर ही निवडणूक लढविण्याची तयारी भाकपने केली आहे.

ते पुढे म्हणाले की, पक्षाने आयटी क्षेत्रातील एक सक्षम व सुशिक्षित उमेदवार दिला आहे. ही निवडणूक जनतेची असून, कोणत्याही घराण्याला मोठे करण्यासाठी नसावी. सध्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर नेत्यांचे पक्षांतर सुरू असून, काही जण या पक्षातून त्या पक्षात जात आहेत. मात्र भाकप एकनिष्ठपणे आणि ठाम विचारसरणीने निवडणुकीला सामोरे जाणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

उमेदवार कॉ. उमेश जोशी यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, कम्युनिस्ट पक्ष हा जागतिक पातळीवरील विचारधारेचा पक्ष आहे. परंतु सध्या कम्युनिस्ट विचार दाबले जात असल्यामुळे अनेक सामाजिक व आर्थिक समस्या निर्माण होत आहेत. शेतकरी आणि कामगार वर्गाची गळचेपी सुरू असून, उजव्या विचारसरणीच्या संघटना धर्मांधतेच्या आधारावर सर्वसामान्यांवर हुकूमशाही पद्धतीने प्रभाव टाकत आहेत, असा आरोप त्यांनी केला. ते पुढे म्हणाले की, समाजाला डाव्या विचारांची नितांत गरज आहे. डावी चळवळ अधिक बळकट करण्यासाठी सर्वसामान्य जनतेने त्यामागे उभे राहणे आवश्यक आहे. सुशिक्षित लोकप्रतिनिधी निवडून आल्यास जनतेचे प्रश्न प्रभावीपणे मांडले जाऊन त्यांचे निराकरण होऊ शकते, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली. या बैठकीत भाकपच्या कार्यकर्त्यांनी एकमुखाने राहुरी पोटनिवडणूक लढवण्याचा निर्धार व्यक्त केला असून, आगामी काळात जोरदार प्रचार मोहीम राबविण्याचा निर्णयही घेण्यात आला.

# अल्पवयीन मुलीला वेश्याव्यवसायासाठी हॉटेलमध्ये डांबून ठेवत केला अत्याचार; एका महिलेसह हॉटेलचालकावर गुन्हा दाखल

नगर - एका १६ वर्षीय अल्पवयीन मुलीला हॉटेल मध्ये डांबून ठेवत तिला बळजबरीने वेश्याव्यवसाय करण्यास भाग पाडले तसेच हॉटेल चालकाने तिला नगर शहरातील एका फ्लॅटवर नेवून तिच्यावर अत्याचार केल्याचा धक्कादायक प्रकार नगर तालुक्यातील रुईछत्तीशी येथे उघडकीस आला आहे. या मध्ये हॉटेल मालकाला एका महिलेने ही साथ दिल्याने दोघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पीडित मुलगी अल्पवयीन असल्याचे माहित असूनही आरोपींनी तिला चुकीच्या कामासाठी प्रवृत्त केले. फेब्रुवारी २०२४ पासून हा प्रकार सुरु होता. सुरुवातीला आरोपी भैय्या उर्फ गणेश संपत गोरे (रा. रुईछत्तीशी, ता. नगर) याने पीडितेला आपल्या ताब्यातील गाडीत बळजबरीने बसवून नगर शहरातील एका फ्लॅटवर नेले. तिथे तिला डांबून ठेवत तिची लज्जा उत्पन्न होईल असे वर्तन केले आणि तिच्यावर शारीरिक अत्याचार केले. त्यानंतर पिडीतेला रुईछत्तीशी येथील हॉटेल वर डांबून ठेवत वेश्याव्यवसाय करायला भाग पाडले. या संपूर्ण प्रकरणात अंजली उर्फ राणी परमेश्वर काळे (रा. वाघोली, पुणे) हिने देखील साथ दिल्याचा फिर्यादीत म्हंटले आहे.

पिडीत मुलीने २६ मार्च रोजी नगर तालुका पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. या फिर्यादी वरून पोलिसांनी दोघा आरोपींच्या विरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ९६, ९८, ९९, ६४, १४०(४) सह बालकांचे लैंगिक अपराधापासून संरक्षण कायदा (पोक्सो) अंतर्गत गुन्हा नोंदवण्यात आला आहे. या गुन्ह्याचा पुढील तपास स.पो.नि. गणेश वारुळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक जयेश गांगुर्डे करत आहेत.


## जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीने तमाम लोकांस कळविणेत येते की, खालील परिशिष्ठात नमुद केलेली फ्लॅट मिळकत विद्यमान मालक यांच्या मालकी हक्काची व कब्जे वहिवाटीची आहे. नमूद मिळकतीच्या मा. नगर भूमापन अधिकारी यांचेकडील मिळकत पत्रिकेवर विद्यमान मालक यांच्या नावाची नोंद झालेली आहे. नमूद मिळकतीची विक्री करण्याची बोली विद्यमान मालक यांनी आमच्या अशिलाबरोबर केलेली आहे त्याद्वारे नमूद मिळकत कायमखुष खरेदी कामी आमच्या अशिलास प्रस्ताव दिलेला आहे. परंतु कोणाचीही तक्रार राहु नये म्हणून या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की नमूद फ्लॅट मिळकतीबाबत कोणतेही चालु वाद असल्यास अथवा साठेखत, खरेदीखत, गहाणखत, दान, वारस हक्क, बक्षिसपत्र मनाईहुकुम, दावा कोर्ट कारवाई बँक बोजा सोसायटी राईटस अन्न वस्त्र लिज अथवा अगर कोणताही कसल्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध असल्यास संबंधीताने ही नोटीस प्रसिध्द झाले पासून **०७ दिवसांचे** आत दिलेल्या पत्यावर **संपुर्ण प्रशासकीय व न्यायिक कागदोपत्री पुराव्यानिशी लेखी कळवावे.** यथायोग्य कागदोपत्री पुराव्याशिवाय आलेल्या व कोणत्याही पुराव्याशिवाय प्रस्तुत जाहिर नोटीसीस केवळ वर्तमान पत्रातून घेतलेल्या कोणत्याही हरकती ग्राह्य धरता येणार नाही. विहित ०७ **दिवस मुदतीत कोणाचीही कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत न आल्यास आमचे अशिल कायदेशीर रजिस्टर दस्तांन्वये विद्यमान मालक यांच्या मालकी हक्काच्या फ्लॅट मिळकतीचा हस्तांतरणाच्या दस्ताच्या व्यवहार पूर्ण करतील** तद्नंतर कोणाचेही कोणत्याही प्रकारे तक्रार अगर हरकत चालणार नाही, असल्यास त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिले आहे असे समजण्यांत येईल.

**परिशिष्ट : १) मिळकतीचे वर्णन :-** डि.।। अहिल्यानगर सब. डि.।। ता. नगर पैकी अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीतील **शहरनगर** येथील बर्डे गल्ली भागातील मे. दु. निबंधक साहेब, अहिल्यानगर यांचे कक्षेतील मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे.

| सिटी सर्व्हे नंबर | क्षेत्रफळ चौरस मीटर |
|---|---|
| ३६८१ | ४४३.९० |

**नमूद मिळकतीवर मंजूर प्लॅनप्रमाणे आर.सी.सी.स्ट्रक्चर फ्रेममध्ये बांधकाम झालेल्या शुभम अपार्टमेंट मधील स्टील्ट फ्लोअरवरील फ्लॅट नं.३ याचे क्षेत्र ७५.४८ चौ.मी.फ्लॅट मिळकत.**

यांसी चतु:सिमा

| पूर्वेस | दक्षिणेस | पश्चिमेस | उत्तरेस |
|---|---|---|---|
| फ्लॅट नं.एफ-४ | स्टेअर केस व फ्लॅट नं.एफ-२ | सिटी सर्व्हे नं.३६८६ व एन्ट्रन्स | सिटी सर्व्हे नं.३६८७ |

येणेप्रमाणे चतु:सिमापूर्वक काही एक राखून न ठेविता.

**मिळकतीचे विद्यमान मालक-**
**१) अनुराधा रणछोडदास गांधी**
**२) संदीप रणछोडदास गांधी**
**३) सुहास रणछोडदास गांधी ४) वर्षा जयेश शहा**
**सर्व रा.बर्डेगल्ली, अहिल्यानगर**
**दि.२७/०३/२०२६**

**ॲड.संदीप दादासाहेब पाखरे**
(बी.एएलएलबी,नोटरी पब्लिक, भारत सरकार)
६२७०, लॉयर्स ऑफिस, लक्ष्मी दिप निवास,
बालिकाश्रम जवळ,अहमदनगर, मो : ९८५०१८१७१७



## : सहकार पणन व वस्त्रोद्योग विभाग :

मे सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, अ.नगर तालुका पतसंस्था फेडरेशन मर्या.अ.नगर महात्मा फुले चौक, मार्केटयार्ड, अ.नगर यांचे कार्यालय.

**जाहीर समन्स**

डॉन बॉस्को नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, संत आण्णा चर्च, कलेक्टर कचेरीजवळ, अहिल्यानगर ता/जि. अहिल्यानगर या संस्थेने त्यांचे कर्जदार/जामिनदार यांचे विरुद्ध महाराष्ट्र राज्य सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१ अन्वये वसुली दाखला मिळणे बाबत प्रस्ताव दिनांक १५/०७/२०२५ रोजी या कार्यालयास दाखल केला असून त्यानुसार या कार्यालयाने कलम १०१ अन्वये दिनांक १८/११/२०२५ व दिनांक १०/१२/२०२५ रोजी सुनावणीची नोटीस देऊन त्यांची सुनावणी दिनांक १०/१२/२०२५ व दिनांक २३/१२/२०२५ व दिनांक ०७/०१/२०२६ व दिनांक २१/०१/२०२६ व दिनांक १०/०२/२०२६ व दिनांक २५/०२/२०२६ रोजी ठेवण्यात आलेली होती. सदर सुनावणीच्या नोटिसा संबंधितांना रजिस्टर पोस्टाने पाठविण्यात आलेल्या होत्या. परंतु सदरच्या नोटीसची बजावणी झालेली नाही किंवा जाबदेणार सुनावणीस हजर राहिलेले नाहीत, नैसर्गिक न्याय तत्त्वाचे दृष्टीने सुनावणीचे जाहीर समन्स दैनिक वर्तमानपत्रात प्रसिद्ध करून त्याची सुनावणी दिनांक ०८/०४/२०२६ रोजी सकाळी १२.०० वाजता मा. सहायक निबंधक सहकारी संस्था (परसेवा) अ.नगर तालुका पतसंस्था फेडरेशन मर्यादित अहिल्यानगर महात्मा फुले चौक, गाळा नं.४, पहिला मजला.जीएस महानगर बँकेशेजारी, अहिल्यानगर यांचे कार्यालयात ठेवण्यात येत आहे. सदर सुनावणीचे दिवशी जाब देणार हे हजर राहिले नाहीत किंवा म्हणणे सादर केले नाही किंवा सादर केलेले म्हणणे समाधानकारक वाटले नाही तर संस्थेने मागणी केले प्रमाणे कलम १०१ अन्वये वसुली दाखला देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

| अ.नं. | दावा | कर्जदार/जामिनदाराचे नांव | दावा रक्कम |
|---|---|---|---|
| १ | १८४ ---- २०२५ | जाबदेणार १) श्री- कुलट उमेश विश्वनाथ<br>राहणारः घर न.१४८. कुलटमळा, वाळकी रोड. बुरूडगाव, अहिल्यानगर,<br>जाबदेणार ४) सौ-कुलट प्रिया उमेश<br>राहणार घर नं.१४८, कुलटमळा, वाळकी रोड, बुरूडगाव, अहिल्यानगर | ४८,९९,३६७/- |
| २ | १८५ ---- २०२५ | जाबदेणार १) श्री राऊत संचित तात्याराम<br>राहणार : प्लॉट ७०, सन. ३७०/२, म्यु. बोअरिंगजवळ, कांबळेमळा, केडगाव.अ.नगर.<br>जाबदेणार २)श्री. राक्षे राजेंद्र अर्जुन<br>राहणार:- प्लॉट १४. सन.८१/१, साईनागे, सावेडी नाका, सावेडी अहिल्यानगर.<br>जाबदेणार ३)श्री-मोरे महेश सुरेश<br>राहणार:- प्लॉट नं. २४, सर्वे नं.५०५, सचिननगर, केडगाव. ता.जि. अहिल्यानगर,<br>जाबदेणार ४) श्री राउत तात्याराम सावाळेराम.<br>राहणार:-प्लॉट ७०, सन.३७०/२. म्यू बोअरिंगजवळ, कांबळेमळा, केडगाव अ.नगर | १८,२४,८७८/- |
| ३ | १८७ ---- २०२५ | जाबदेणार १) श्री-निमसे महेश हरिभाऊ.<br>राहणार:- गट नं.२६९. आबाजी चौक, बुरूडगाव.ता/जि-अ.नगर.<br>जाबदेणार २)श्री-वाणे अजय लक्ष्मण,<br>राहणार : घर नं.६, म्युन्सी. कॉलनी, गोगादेव मंदिराजवळ, दिल्लीगेट, अ. नगर.<br>जाबदेणार ३) श्री-फुगारे संजय नारायण.<br>राहणार :- साईराज, रो. हौ. रेणुकानगर, महालक्ष्मी मंदिराजवळ, बोल्हेगाव. अ.नगर.<br>जाबदेणार ४) सौ-निमसे माधुरी महेश.<br>राहणार :- गट नं. २६९, आबाजी चौक, बुरूडगाव. ता/जि-अहिल्यानगर | ३६,५५,७४१/- |

ठिकाण : अहिल्यानगर
दि.२५/०३/२०२५

**(बाळकृष्ण शिंदे)**
सहाय्यक निबंधक सहकारी संस्था (परसेवा), अ.नगर तालुका पतसंस्था फेडरेशन,अ.नगर


# नगरमधील अवैध गॅस रिफिलिंग सेंटरवर पोलिसांचा छापा

**दोघांवर गुन्हा दाखल, १६ गॅस टाक्यांसह साहित्य जप्त**

नगर - शहरातील तोफखाना पोलीस ठाण्याच्या हद्दीत विनापरवाना घरगुती गॅस टाक्यांची साठवणूक आणि अवैध रिफिलिंग करणाऱ्या अड्ड्यावर स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने कारवाई केली आहे. गुलमोहर रोडवरील पारीजात चौकाजवळ असलेल्या एका पत्र्याच्या गोदामात हा धोकादायक प्रकार सुरू होता.



याप्रकरणी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस अंमलदार प्रशांत राम राठोड यांनी दिलेल्या फिर्यादीवरून शहानवाज शौकत सय्यद आणि साद अन्वर खान या दोघांविरुद्ध गुन्हा नोंदवण्यात आला आहे. जिल्ह्यामध्ये गॅस टंचाईच्या काळात गॅस टाक्याची अवैध साठवणुक करुन घरगुती गॅस टाक्यामधुन व्यावसायिक टाक्यांमध्ये अवैधरीत्या रिफीलिंग करणाऱ्यांवर कारवाई साठी पोलिस अधिक्षक सोमनाथ घार्गे यांच्या आदेशानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पो.नि. किरणकुमार कबाडी यांनी उपनिरीक्षक अनंत सालगुडे पोलीस अंमलदार सोमनाथ झांबरे, बाळासाहेब नागरगोजे, प्रशांत राठोड, महिला पोलीस अंमलदार, भाग्यश्री भिटे, सोनल भागवत यांचे पथक तयार केलेले आहे. हे पथक शहरात गस्त घालत असताना २६ मार्च रोजी दुपारी त्यांना माहिती मिळाली की, आरोपी साद खान याच्या सांगण्यावरून शहानवाज सय्यद हा कोणत्याही कायदेशीर परवानगीशिवाय घरगुती गॅस टाक्यांमधून गॅस चोरून तो इतर टाक्यांमध्ये भरण्याचे काम करत करत आहे. या पथकाने तात्काळ त्या ठिकाणी छापा टाकत शहानवाज सय्यद याला मुद्देमालासह ताब्यात घेतले. भरवस्तीत ज्वलनशील पदार्थांची अशा प्रकारे निष्काळजीपणे हाताळणी करून मानवी जीवितास धोका निर्माण केल्याचा ठपका ठेवत दोघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी या छाप्यात ११ हजार रुपये किमतीच्या एचपी कंपनीच्या १० रिकाम्या आणि १ भरलेली टाकी, २० हजार रुपये किमतीची गॅस भरण्याची इलेक्ट्रिक मोटार यंत्रणा आणि ५ लहान गॅस टाक्या असा एकूण ३३ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. पुढील तपास पोलीस हवालदार गोसावी करत आहेत.

# नगरमध्ये १ एप्रिलपासून दहावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी मोफत ब्रिज कोर्स

## नवभारत प्रोफेशनल अकॅडमीचा उपक्रम

नगर - इयत्ता दहावीची परीक्षा पूर्ण झाल्यानंतर विद्यार्थ्यांसमोर पुढील शिक्षणाचा महत्त्वाचा टप्पा उभा राहतो. विशेषतः कॉमर्स शाखेत प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी योग्य मार्गदर्शनाची गरज लक्षात घेऊन नवभारत प्रोफेशनल अकॅडमी तर्फे मोफत ब्रिज कोर्सचे आयोजन करण्यात आले आहे. हा कोर्स १ एप्रिल पासून सुरू होणार असून विद्यार्थ्यांनी वेळेत नोंदणी करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

या कोर्समध्ये कॉमर्समधील महत्त्वाच्या विषयांची मूलभूत ओळख करून देण्यात येणार असून अनुभवी व तज्ञ शिक्षकांकडून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले जाणार आहे. यामुळे विद्यार्थ्यांना ११वीच्या अभ्यासक्रमाची पूर्वतयारी करता येणार असून आत्मविश्वास वाढण्यास मदत होणार आहे.

या उपक्रमाचे मार्गदर्शक भरत झंवर यांनी गेल्या १३ वर्षांत १६,००० पेक्षा अधिक विद्यार्थ्यांना करिअर मार्गदर्शन केले आहे. त्यांच्या अनुभवाचा लाभ या ब्रिज कोर्समधील विद्यार्थ्यांना होणार आहे. विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी स्वतंत्र बॅचेसची व्यवस्था करण्यात आली आहे. मुलं आणि मुलींसाठी स्वतंत्र बॅचेस तसेच बॅच १, २ आणि ३ अशा वेगवेगळ्या वेळांमध्ये वर्ग आयोजित केले जाणार आहेत. या उपक्रमाचा उद्देश विद्यार्थ्यांना योग्य दिशा देणे, कॉमर्स शाखेबद्दलची स्पष्ट समज निर्माण करणे आणि भविष्यातील करिअरसाठी भक्कम पाया तयार करणे हा आहे.

प्रवेशासाठी इच्छुक विद्यार्थ्यांनी लवकरात लवकर नोंदणी करावी, असे आवाहन संस्थेतर्फे करण्यात आले आहे. माहिती व नावनोंदणीसाठी संपर्क : ९५९५२२२७३०


## जाहीर नोटीस

प्रति. **श्री.महंमद आसीफ रफिक शेख**
रा.घर नं.१९१ ए, मोमीनगल्ली
भिंगार,ता.जि.अहिल्यानगर } : अर्जदार
विरुध्द
अधिकारी जन्म मृत्यू नोंदणी विभाग.
अहिल्यानगर महानगरपालिका,अहिल्यानगर } : सामनेवाले

ज्याअर्थी, अर्जदार **श्री.महंमद आसीफ रफिक शेख,** यांनी सदरचा अर्ज जन्म मृत्यू नोंदणी अधिनियम. १९६९ चे **कलम १३ (३) अन्वये मा.अपर तहसिलदार अहिल्यानगर यांचे न्यायालयात दाखल केलेला आहे. अर्जदार** श्री.महंमद आसीफ रफिक शेख यांचा जन्म दि.२९/०९/१९६८ रोजी जन्म झालेला आहे. त्यांच्या जन्माची नोंद प्रतिवादी यांचेकडे होऊन तसे जन्म प्रमाणपत्र मिळणेकरिता सदरचा अर्ज मे. न्यायालयात दाखल केला आहे.

त्याअर्थी, अर्जदार श्री.महंमद आसीफ रफिक शेख यांचा जन्म दि. २९/०९/१९६८ रोजी जन्म झालेला नाही, असे जर कोणाचे म्हणणे असल्यास, त्यांनी या जाहीर नोटीस प्रसिध्दीचे दिनांकापासून १५ दिवसांचे आत आपली लेखी हरकत कागदपत्र पुरावे मा. अपर तहसिलदार अहिल्यानगर यांचे कार्यालयात सादर करावे. तसेच मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर कार्यालय अर्जदाराचा पुरावा घेऊन वर नमूद अर्जदार श्री.महंमद आसीफ रफिक शेख यांचा जन्म दि.२९/०९/१९६८ रोजीच्या जन्माची नोंद सामनेवाला यांचेकडे घेऊन तसा दाखला अर्जदार यांना देण्याचा हुकुम करतील. तद्नंतर कोणाचीही कोणत्याही प्रकारची तक्रार गृहीत धरली जाणार नाही. येणेप्रमाणे आज दिनांक २७/०३/२०२६ रोजी जाहीर नोटीस माझे सही व शिक्यानिशी दिली असे.

**स्वप्निल ढवळे**
अपर तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी अहिल्यानगर



## जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीने तमाम लोकांस कळविणेत येते की, खालील परिशिष्ठात नमुद केलेल्या प्लॉटस् मिळकती विद्यमान मालक **१. डॉ. नीरज जयंत करंदीकर, २. सौ. दीप्ती नीरज करंदीकर,** रा. बोरुडे मळा, अहिल्यानगर, यांच्या मालकी वहिवाटीच्या असून सदर प्लॉटस् मिळकतीचा व्यवहार आमच्या अशिलाबरोबर ठरलेला असून लवकरच खरेदीखत होणार आहे. सदर प्लॉटस् मिळकती निर्वेध व निजोखमी आहे असे खरेदी देणाराचे म्हणणे आहे. परंतु कोणाचीही कोणतीही तक्रार राहु नये म्हणून या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, **कोणाचेही कोणत्याही प्रकारे मालकी हक्क, हितसंबंध, ताबा, खरेदीखत, साठेखत, करारनामा, मनाई, दावा, लिज, गहाण, दान, बक्षिस, पोटगी हक्क व इतर कोणतेही हक्क हितसंबंध असल्यांस** त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाले पासुन ७ **(सात) दिवसांचे** आत खालील दिलेल्या पत्यावर संपूर्ण कागदोपत्री पुराव्यानिशी लेखी कळवावे, जर मुदतीत कोणाचेही कोणतेही हरकत न आल्यास आमचे अशिल सदर प्लॉटस् मिळकती खरेदी विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील मग कोणाचेही कोणत्याही प्रकारे अगर हरकत चालणार नाही, असल्यास त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिले आहे, असे समजण्यांत येईल याची नोंद घेण्यांत यावी.
**परिशिष्ट : मिळकतीचे वर्णन :** जिल्हा अहिल्यानगर पोट तुकडी व तालुका नगर पैकी अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीतील **मौजे बोल्हेगांव** येथील मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे **-सर्व्हे नंबर ६७/२/१ मधील खालील वर्णनाचे प्लॉटस् -**

| प्लॉट नंबर | क्षेत्रफळ चौ.मी | चतु:सिमा पुर्वेस | दक्षिणेस | पश्चिमेस | उत्तरेस |
|---|---|---|---|---|---|
| २ | १७०.५० | १२ मीटर रुंदीचा डी.पी रस्ता | प्लॉट नं.३ | प्लॉट नं.२१ | प्लॉट नं.१ |
| ३ | १७०.५० | १२ मीटर रुंदीचा डी.पी रस्ता | प्लॉट नं.४ | प्लॉट नं.२० | प्लॉट नं.२ |
| ४ | १३९.५० | १२ मीटर रुंदीचा डी.पी रोड | प्लॉट नं.५ | प्लॉट नं.१९ | प्लॉट नं.३ |
| १९ | १३९.५० | प्लॉट नं.४ | प्लॉट नं.१८ | ९.०० मीटर रुंदीचा रस्ता | प्लॉट नं.२० |
| २० | १७०.५० | प्लॉट नं.३ | प्लॉट नं.१९ | ९.०० मीटर रुंदीचा रस्ता | प्लॉट नं.२१ |
| २१ | १७०.५० | प्लॉट नं.२ | प्लॉट नं.२० | ९.०० मीटर रुंदीचा रस्ता | प्लॉट नं.२२ |

**वर नमूद केलेले संपूर्ण प्लॉटस्.**

येणेप्रमाणे चतु:सिमापूर्वक काही एक राखून न ठेविता..

**ॲड.तनवीर एम.शेख** नोटरी पब्लिक (भारत सरकार) । **ॲड.मोहसीन आय.शेख, ॲड. गुफरान एफ.मोमीन**
कस्तुरी प्लाझा, डावरे गल्ली, अहमदनगर, मो.नं.९२७०४६४६००/ ८०८७७४२४२८


मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

